# राजवाडे लेखसंग्रह

Marathipustakeची श्रेयनामावली

टंकलेखन:-   राहुल प्रकाश सुवर्णा

मुद्रितशोधन:-   राहुल प्रकाश सुवर्णा

# अनुक्रमणिका


| प्रकरण | पान नं. |
| --- | --- |
| मराठयांचा इतिहास कसा लिहावा? | पान नं. 3 |
| महाराष्ट्राची वसाहत | पान नं. 7 |
| मराठी राज्याचा विकास | पान नं 41 |
| इतिहासाच्या दोन बाजू:- भैतिक व आध्यात्मिक | पान नं. 45 |
| इतिहास म्हणजे काय? | पान नं. 47 |
| मगध | पान नं. 49 |
| नट आणि निच्छिवि | पान नं. 52 |

# मराठयांचा इतिहास कसा लिहावा?

मराठयांचा इतिहास लिहावा तरी कसा असा प्रश्न साहजिक उदभवतो. ह्याला उत्तर असें आहे कीं मराठयांचा इतिहास शास्त्रीय पध्दतीनें लिहिला तरच त्याला कांहीं किंमत देतां येईल. इतिहास लिहिण्याला प्रस्तुतची संधि महाराष्ट्रांतील लोकांना मोठी उत्तम आली आहे. इतिहास उत्तम तऱ्हेनें कसा लिहितां येईल ह्याची फोड युरोपांतील शास्त्रांनीं करून ठेविलेली आहे. ह्या फोडीचा फायदा करून घेऊन मराठयांच्या इतिहासाची इमारत उभारली पाहिजे. युरोपांत सतराव्या व अठराव्या शतकांत इतिहासकारांनीं व चरित्रकारांनीं ज्या चुका केल्या त्याच जर आपण एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं करूं लागलों तर एकोणिसाव्यास शतकांतील युरोपाशीं आपला परिचय व्यर्थ झाला असें होईल.

**इतिहासरचनेचीं पांच कलमें**

मराठयांच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांनीं खालील कलमें लक्षांत बाळगिली पाहिजेत. (१) कोणताहि पूर्वग्रह घेऊन इतिहास किंवा चरित्रें लिहावयास लागूं नये. आतांपर्यंत लिहिलेल्या बहुतेंक चरित्रांतून हा दोष ढळढळीत दिसून येतो. महादजी शिंदे, गोविंदपंत बुंदेले, परशरामभाऊ पटवर्धन, बापू गोखले, पहिला बाजीराव, वगैरे सर्व सेनानायक एकासारखे एक अप्रतिम योध्दे होते असा त्या त्या ग्रंथकारांचा सागण्याचा झोंक असतो. आतां पहिल्या बाजीरावाच्या बरोबरीला ह्यांपैकीं एकहि योध्दा बसवितां येणार नाहीं हें उघड आहे. तसेंच बाजीरावाच्या खालोखाल महादजीच्या तोडीचा ह्यांत एकहि सेनापति नाहीं. परशरामभाऊ पटवर्धन दुय्यम प्रतीचा सेनानायक होता असें मला वाटतें. गोविंदपंत बुंदेले व बापू गोखले हे कनिष्ठ प्रतीचे सेनापति होत. हें कोणीही समजंस मनुष्य कबूल करील. बापू गोखल्यानें तर कोण्या एका गोऱ्याचें सर्टिफिकेट घेऊन ठेविलें होतें! सर्टिफेकटया सेनापतीची किती किंमत करावयाची तें मुद्दाम फोड

करून सांगितली पाहिजे असें नाहीं! हें सेनापतित्वासंबंधीं झालें. कित्येकांचा पूर्वग्रह मराठे सर्व प्रकारें श्रेष्ठ होते असें दाखविण्याचा असतो; कित्येकांचा ह्याच्या उलट असतो. तेव्हां पूर्वग्रहांना टाळा देणें ही मुख्य गोष्ट होय. (२) भरपूर अस्सल माहिती मिळाल्याशिवाय चरित्र किंवा इतिहासाचा भाग लिहिण्याचा खटाटोप करूं नये. (३) तशांतूनहि लिहावयाचा संकल्पच असेल तर आपल्याला माहिती कोणती नाहीं तें स्पष्ट लिहावें. अस्सल भरपूर लेखसंग्रह जवळ असल्यावांचून जो कोणी इतिहास लिहावयाला जाईल त्याला माहिती नाहीं असा शेरा पुष्कळच प्रसंगांसंबंधीं द्यावा लागेल. (४) अस्सल भरपूर माहितीवरून कांहीं सिध्दांत काढावयाचा तो काढावा. हें चवथें कलम पहिल्या कलमाचेंच एका प्रकारचें रूपांतर आहे अशी समजूत होण्याचा संभव आहे; परंतु तसा प्रकार नाहीं. पहिल्या कलमांत पूर्वग्रहप्रधान पध्दतीचा निर्देश केला आहे व ह्या चवथ्या कलमांत पश्चाद्ग्रहप्रधानपध्दतीचा निर्देश केला आहे. पूर्वग्रह मनसोक्त काढिलेलाच असतो. पश्चाद्ग्रह अस्स्ल भरपूर आधारांतून जात्या जो निघेल तोच घ्यावयाचा असतो.

अलीकडे जे इतिहास व चरित्रग्रंथ लिहिले गेले आहेत. त्यांत ह्या पूर्वग्रहाच्या पध्दतीचें प्राधान्य विशेष दिसून येतें. कित्येक ग्रंथांतून ह्या दोन्ही पध्दतींची भेसळ झालेली आढळून येते. उदारणार्थ, एका ग्रंथांतील शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधानात्मक राज्यपध्दतीविषयीं क्लृप्ति पहा. ह्या क्लृप्तींत तीन सिध्दांत ठरवावयाचे आहेत. (अ) शिवाजीची राज्यपध्दति अष्टप्रधानात्मक होती; (ब) ती मुसलमानांच्या राज्यपध्दतींहून निराळी होती; (क) व युरोपांतील क्याबिनेट गव्हर्मेंटसारखी ती होती. क्लृप्तींतील पहिला भाग तेवढा बव्हंशीं पश्चाद्ग्रहोत्पन्न म्हणजे साधार आहे. शिवाजीच्या ज्या बखरी व एक दोन अस्सल कागदपत्र आजपर्यंत प्रसिध्द झाले आहेत त्यांच्या आधारावर शिवाजीची राज्यपध्दति (अष्ट) प्रधानात्मक होती असें विधान करण्यास कांहीं एक हरकत नाहीं.

आतां त्या प्रधानांची संख्या आठ होती किंवा त्याहून जास्त होती ह्या गोष्टीचा विचार करणें जरूर आहे. काव्येतिहाससंग्रहांतील ४०४ हें पत्र शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळचा कानूजाबता आहे. ह्या पत्रांत मुख्य प्रधान, अमात्य, सचीव, सेनापति, पंडितराव, न्यायाधीश, मंत्री, चिटणीस, सुमंत, बक्षी, सेनाधुरंदर, अशा अकरा अधिकाऱ्यांची प्रधानांत गणना केली आहे. युध्दादि प्रसंग किंवा राजपत्रांवर चिन्ह करण्याचा अधिकार ज्यांना असेल ते प्रधान होत असा ह्या कानजाबत्यांतील मायन्याचा आशय असतो. याप्रमाणें वर दिलेले अकरा अधिकारी प्रधान ठरतात. परंतु ह्या कानूजाबत्यांच्या शेवटल्या कलमांत ह्या प्रधानमंडळाला अष्टप्रधान म्हणून संज्ञा दिली

आहे. तेव्हां अष्टप्रधान ही संज्ञा विशिष्ट संख्यावाचक नसून केवळ समुदायवाचक आहे असा सिध्दांत काढणें अवश्य होतें. ह्या सिध्दांताला पोषक असें शिवाजीच्या कारकीर्दीतील दुसरें एखादें पत्र अद्यापपर्यंत उपलब्ध नाहीं; परंतु राजारामाच्या कारकीर्दीत अष्टप्रधानांत एकंदर नऊ असाम्या होत्या असें राजारामाच्या बखरीवरून ठरतें. तसेंच शाहूमहाराजांच्या कारकीर्दीतहि नऊ असाम्या होत्या असें काव्येतिहाससंग्रहांतील ४०५ पत्रावरून कबूल करावें लागतें. अष्टप्रधानांची संख्या शिवाजीच्या पुढें आठच नव्हती हें ह्या दोन आधारांवरून सिध्द आहे, व तोच प्रकार शिवाजीच्या वेळींहि होता, हें ४०४ पत्रावरून उघड आहे. हा वाद आठ ह्या संख्येपुरताच आहे. बाकी शिवाजीची राज्यपध्दति (अष्ट) प्रधानात्मक होती हा सिध्दांत साधार आहे हें निर्विवाद आहे.

आतां ही राज्यपध्दति शिवाजीनें अजीबात नवीन शोधून काढिली किंवा मुसुलमानांपासून घेतली किंवा पूर्वीच्या संस्कृत नीतिशास्त्रांतून घेतली? माझ्या मतें शिवाजीनें ही राज्यपध्दति मुसुलमानांपासून घेतली. पेशवा, मुजुमदार, वाकनीस, सुरनीस, डबीर वगैरे अधिकाऱ्यांचीं नांवें मुसुलमानांच्या दरबारांतील आहेत. त्यांना मुख्य प्रधान, अमात्य, मंत्री, सचीव, सुमंत वगैरे संस्कृत नांवें शिवाजीनें दिली. बाकी शिवाजीची पध्दति मुसुलमानांच्या पध्दतीचेंच हुबेहूब अनुकरण होतें.

ही अष्टप्रधानात्मक पध्दत प्रस्तुतच्या युरोपांतील क्याबिनेट पध्दतीप्रमाणें तर नव्हतीच, परंतु सतराव्या शतकांतील युरोपांतील कित्येक देशांतील क्याबिनेट पध्दतीप्रमाणें ती कांहींशी होती. शिवाजीच्या पध्दतींत व सतराव्या शतकांतील युरोपियन पध्दतींत अंतर असें आहे कीं शिवाजीचें न्यायाधीश व पंडितराव ह्या दोन प्रधानांखेरीज बाकीचे सर्व प्रधान लढाया करीत व युरोपांतील प्रधानांना हा शिपायगिरीचा धंदा बहुशः माहीत नसे. सारांश, शिवाजीच्या प्रधानमंडळींचें साम्य यूरोपांतील कोणत्याहि शतकांतील क्याबिनेटशीं नाहीं. शिवाजीनें केवळ मुसुलमानांचा कित्ता गिरविलेला आहे. तेव्हां त्या क्लृप्तींत सूचित होणारी (ब) आणि (क) हीं कलमें पूर्वग्रहात्मक होत हें उघड आहे. सत्यासत्य पध्दतींची भेसळ होते ती ही अशी होते. ह्या भेसळीला फार जपलें पाहिजे. (५) उपमान प्रमाणावर कोणताहि सिध्दंत ठरवूं नये. हीं पांच कलमें लक्षांत ठेवून इतिहासरचना केली असतां ती सन्मान्य होईल ह्यांत संशय नाहीं.

**मराठयांच्या इतिहासाच्या शाखा**

मराठयांच्या राष्ट्राच्या जीवनचरित्राचा अभ्यास अनेक दिशांनीं केला पाहिजे. (१) मराठयांचा सामजिक इतिहास. (२) मराठयांचा राजकीय इतिहास, (३) मराठयांच्या धर्माचा इतिहास, (४) मराठयांच्या संस्कृतीचा इतिहास. (५) मराठयांच्या भाषेचा इतिहास, (६) मराठयांच्या मोहिमांचा इतिहास. (७) मराठयांच्या लष्कराचा इतिहास. (८) मराठयांच्या आरमाराचा इतिहास, (९) मराठयांच्या कायदेकानूंचा इतिहास, (१०) मराठयांच्या किल्ल्यांचा इतिहास, (११) मराठयांच्या जमीनमहसुलाचा इतिहास वगैरे शाखांचा सशास्त्र व सोपपत्तिक असा अभ्यास झाला पाहिजे. मराठयांच्या राजकीय इतिहासाचा सध्यां येथें विचार चालला आहे, तेव्हां त्याचे विभाग सशास्त्र किती करितां येतील तें स्थूलमानानें सांगतों. (१) इ.स. १६४६ पर्यत शिवाजीच्या पूर्वीचा इतिहास, (२) १६४६ पासून १६८० पर्यंतचा स्वातंत्र्यार्थ लढाईचा इतिहास, (३) १६८० पासून १७०७ पर्यंतच्या स्वातंत्र्यार्थ लढाईच्या शेपटाचा इतिहास, (४) १७०७ पासून १७३१ पर्यतचा स्वराज्य स्थापनेचा व हिंदुपदबादशाहीचा इतिहास, (५) १७३१ पासून १७६१ पर्यंतचा ब्राह्मणपदबादशाहीचा इतिहास, (६) १७६१ पासून १७९६ पर्यंतचा ब्राह्मणपदबादशाहीच्या जगवणुकेचा इतिहास. (७) १७९६ पासून १८१८ पर्यंतचा महाराष्ट-साम्रज्याच्या ऱ्हासाचा इतिहास, (८) १८१८ पासून १८९८ पर्यंतचा महाराष्ट्राच्या अवनतीचा इतिहास. मराठयांच्या इतिहासाच्या ह्या विभागाबरोबर महाराष्ट्राच्या भूज्ञानाचाहि अभ्यास झाला पाहिजे.

# महाराष्ट्राची वसाहत

### महाराजिक व महाराष्ट्रिक

हे महरट्ट ऊर्फ माहाराष्ट्रिक लोक कोण, या बाबीचा प्रपंच “महाराष्ट्राचा वसाहतकाल” या लेखांत कांहीं केला आहे. ‘महाराजाट्ठन’ ह्या सूत्रांत पाणिनी सांगतो कीं महाराज हा ज्यांच्या भक्तीचा विषय त्यांना माहाराजिक म्हणतात. महाराज म्हणजे कोण? महाराज या शब्दाचे पाणिनीकालीं दोन अर्थ होते. महाराज म्हणजे इंद्र व महाराज केवळ सामान्य राजांहून जो मोठा राजा तो. पैकीं पहिला अर्थ घेतला तर माहाराजिक हे लोक इंद्राचे भक्त ठरतात. आणि दुसरा अर्थ घेतला तर महाराजसंज्ञक किंवा महाराजपदवीधर भूपतीचे जे भक्त ते माहाराजिक ठरतात. माहाराजिक शब्दाचे दोन्हीं अर्थ घेतले, तत्रापि माहाराजिक शब्दाचा माहाराष्ट्रिक शब्दांशीं संबंध काय? हा प्रश्न रहातोच. हा प्रश्न असा सोडवितां येतो. राजा ज्या भूमीवर राज्य करतो त्या भूमीला राष्ट्र म्हणत आणि राष्ट्र हें ज्यांच्या भक्तीचा विषय त्यांना राष्ट्रिक म्हणत. त्याप्रमाणेंच महाराजा ज्या भूमीवर माहाराज्य करीं त्या भूमीला महाराष्ट्र म्हणत आणि महाराष्ट्र हें ज्यांच्या भक्तीचा विषय त्यांना माहाराष्ट्रिक म्हणत. महाराजा हा ज्यांच्या भक्तीचा विषय त्यांना माहाराजिक म्हणत व महाराजाचें महाराष्ट्र तें ज्यांच्या भक्तीचा विषय त्यांना माहाराष्ट्रिक म्हणत. तात्पर्य, महाराज या व्यक्तीच्या अनुलक्षानें माहाराजिक हा शब्द व महाराष्ट्र या देशाच्या अनुलक्षानें माहाराष्ट्रिक हा शब्द असे हे दोन्ही शब्द वस्तुतः एकार्थक आहेत.

### वसाहतकार महाराष्ट्रिक, राष्ट्रिक व वैराष्ट्रिक

एणेंप्रमाणें माहाराजिक तेच महाराष्ट्रिक, ही बाब निश्चित झाल्यावर, आतां दुसरा अस प्रश्न निघतो कीं दक्षिणारण्यांत वसाहत करण्यास जेव्हां माहाराष्ट्रादि लोक निघाले तेव्हां उत्तरहिंदुस्थानांत महाराजपदवी धारण करणारे कोण भूपति होते व महाराष्ट्र हें नांव ज्याला

साजेल असा कोणता देश होता? सांगावयाला नकोच कीं असा देश म्हणजे त्याकाळीं मगध होता. प्रद्योत, शैशुनाग, नंद व मोर्य ह्यांनीं एका पाठीमागून एक जें माहाराज्य केलें तें मगद्यांत केलें. माहाराज्य म्हणजे काय? त्या कालीं एकछत्री सत्तेला माहाराज्य म्हणत. ऐतरेय ब्राह्मणांत (३८/३९ अध्याय) साम्राज्य, मौज्य, स्वाराज्य, वैराज्य, पारमेष्ठय, राज्य, माहाराज्य, आधिपत्य, स्वावश्य, आतिष्ठ्य व एकराज्य, असे अकरा प्रकारचे नरपति ख्यापिले आहेत. मगधांतील भूपति एकछत्र ऊर्फे एकराट् होते, म्हणजे राज्य, साम्राज्य, माहाराज्य इत्यादि दहा प्रकारच्या सत्ता भोगणाऱ्यांहून श्रेष्ठ होते, तेव्हां ते महाराज होते हें सिध्दच आहे. ह्या मगधदेशाधिपति महाराजांचे जें भक्त ते माहाराष्ट्रिक म्हणून स्वतःला म्हणत आणि दक्षिणारण्यांत वसाहती जेव्हां ह्यांनीं केल्या तेव्हां माहाराष्ट्रिक अशी ह्यांची प्रख्या सहजच झाली.

मगधांतील माहाराष्ट्रिक लोक बौध्दक्रांतीला कंटावळून ज्याप्रमाणें दक्षिणारण्यांत शिरले त्याचप्रमाणें राष्ट्रिक ह्या नांवाचेहि दुसरे लोक त्याकालीं दक्षिणेंत उतरले. हे राष्ट्रिक लोक म्हणजे अशोक आपल्या शिलालेखांत ज्यांना रास्टिक म्हणतो ते. राष्ट्रिक लोक मगधांतले नव्हत. ह्या लोकांचा देश कुरूपांचाल म्हणत तो. तात्पर्य, राष्टिक निराळे व माहाराष्टिक निराळे. ऐतरेयब्राह्मणाच्या अडतिसाव्या अध्यायांत खालील वाक्य आलें आहे.

**“एतामेव देवानां विहितिं अंवथैनं अस्यां**
**ध्रुवायां मध्यमायां प्रतिष्ठायां दिशि**
**साध्याश्चाप्त्याश्च देवा षडभिश्चैव पञ्चविंशै -**
**रहोभिः अभ्यषिञ्चन एतेन च तृचेन एतेन च**
**यजुषा एताभिश्च व्याहृतिभी राज्याय, तस्माद अस्यां**
**ध्रुवायां मध्यमायां प्रतिष्ठायां दिशि ये के च**
**कुरूपाञ्चालानां राजानः सवशोशीनराणां राज्याय एव**
**तेSभिषिञ्चंते राजेत्येनान अभिषिक्तान आचक्षते”**

भारतवर्षाच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर ह्या दिशांच्यामध्यें असणाऱ्या कुरूपांचालांतील नरपतींना राजा हा किताब असतो असा वरील वाक्याचा मुख्य अभिप्राय आहे. अर्थात, ह्या कुरूपांचालांतील राजांच्या राज्याला राष्ट्र ही विशिष्ट संज्ञा असे व त्या राष्ट्राचे जे भक्त त्यांना राष्ट्रिक हें विशिष्ट अभिधान असे. अशोक माहाराष्ट्रिकांचें नांव काढीत नाहीं. राष्ट्रिकांचें काढतो.

त्यावरून दिसतें कीं राष्ट्रिक हे त्याच्या अंमलखालीं होते आणि माहाराष्ट्रिक नव्हते. तात्पर्य, राष्ट्रिक हे माहाराष्ट्रिकांहून निराळे लोक होते.

बौध्दक्रांतिकालांत आणीक तिसरे लोक दक्षिणाराण्यांत वसाहती करण्यास आले. त्यांचें नांव वैराष्ट्रिक. हे लोक विराट नामक राजांच्या देशांतले म्हणजे उत्तरकुरू व उत्तरमद्र या देशांतले रहिवाशी ऊर्फ जनपद होत. विराज हें ज्या राजांचें नांव त्याच्या राज्याला विराष्ट्र म्हणत व विराष्ट्रावर भक्ति करणारे जे लोक त्यांना वैराष्ट्रिक म्हणत.

असे हे तीन प्रकारचे व तीन देशांतले लोक महाराष्ट्रांत बौध्दक्रांतिकालीं वसाहती करण्यास उतरले. पैकीं, माहाराष्ट्रीकांनीं नर्मदेपासून भीमेपर्यंतचा सहयाद्रिकिनारा व देवगिरीपासून पैठणप्रांतापर्यंतचा देशभाग व्यापिला. महरट्टांचे उल्लेख नाशिक, जुन्नर, कान्हेरी, इत्यादि प्रांतांतील शिलालेखांत सांपडतात. वैराष्ट्रिक लोकांनीं पुण्याच्या दक्षिणेंस सध्यां ज्याला वायदेश म्हणतात त्याच्या आसपासचा विस्तीर्ण मुलूख आक्रमण केला. वाईप्रांताला विराटदेश म्हणण्याची चाल माहात्म्यांतून व दंतकथांतून असलेली आढळते. खुद्द वाई शहराला विराटनगरी आणि जवळील किल्ल्याला विराटगड ऊर्फ वैराटगड हीं नावें अद्यापहि प्रचलित आहेत. पांडवांनीं अज्ञातवासाचीं बारा वर्षे ज्या देशांत काढिलीं तो विराटदेश हाच होय, अशी लौकिक समजूत आहे. परंतु तींत विशेष तथ्य नाहीं, हें सागांवयाला नको. वैराटगड ऊर्फ वैराडगड हा शब्द वैराष्ट्रिक गड ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. असें दिसतें की, वैराष्ट्रिक लोकांनीं ह्या गडावर वसाहतकालीं ठाणें देऊन भोंवतालील प्रांतांवर अंमल केला आणि गडाला आपलें नांव दिलें. कदाचित उत्तरकर्नाटकांतील बेरड हे लढवय्ये लोक वैराष्ट्रिकांचे ( वैराष्ट्रिक = बेरट्ट = बेरड) वंशज असावे असा मला संशय येतो. राष्ट्रिक लोकांनीं सध्यां ज्याला दक्षिण महाराष्ट्र म्हणतात तो प्रांत व निजामच्या राज्यांतील बीडपासून म्हैसूरजवळील सौंदत्ती वगैरे प्रांतांपर्यंतचा व सर्व मुलूख आटोपिला. रट्टांच्या ऊर्फ राष्ट्रिकांच्या नांवावरून रट्टपाटी, रट्टगिरि, रट्टपळ्ळी, रट्टेहल्ली, रट्टज्जुन (राष्ट्रकार्जुनकं) रड्डी, रेडी, इत्यादि कितीतरी गांवांचीं, प्रांतांचीं, व्यक्तींचीं व जातींचीं नांवें महशूर आहेत. तात्पर्य, माहाराष्ट्रिक उत्तरेस, वैराष्ट्रिक मध्यभागीं आणि राष्ट्रिक दक्षिणभागीं दंडकारण्यांत वसाहत करते झाले. कालांतरानें उत्तरेकडील माहाराष्ट्रिकांचें प्राबल्य व प्राधान्य सर्वांहून अधिकतम होऊन, ह्या सर्वांना माहाराष्ट्रिरक ही एकच संज्ञा लागू झाली व तिघांचे तीन देश मिळून त्रिमहाराष्ट्र असें त्रिकलिंग, त्रिगर्त, त्रिकूट, त्रिपुर, ह्या नांवाच्या धर्तीचें नांव पडलें. ह्या त्रिमहाराष्ट्रक देशांत शकाच्या सहाव्या शतकांत नव्याण्णव हजार गांवें होतीं म्हणून

ताम्रपटांत लिहिलेलें आढळतें तें अक्षरक्षः खरें आहे. खानदेश, नाशिक, अहमदनगर, पुणें, सातारा, सोलापूर, बेळगांव, धारवाड, विजापूर, कारवार, रत्नागिरी, कुलाबा, ठाणें, मिळून सुमारें चाळीस हजार गांवें आहेत. ह्यांत औरंगाबाद, बीड, बेदर, नांदेड, वगैरे निजामच्या राज्याचा मराठवाडा मिळविला व म्हैसूरचा उत्तरभाग मिळविला म्हणजे नव्याण्णव हजारांची संख्या सहज होईल. त्यांत एवढें मात्र लक्षांत घेतलें पाहिजे कीं, सध्यां सुमारे चतुर्थांश गांवठाणें ओसाड आहेत. सध्यां पंचाहत्तर हजार ग्रामसंख्या भरली म्हणजे सहाव्या शतकांतील नव्व्याण्णव हजार संख्या झाली, असा अर्थ घेण्याला कांही एक हरकत नाही.

राष्ट्रिक, वैराष्ट्रिक व माहाराष्ट्रिक हे लोक मगध, कुरूपांचाल, व उत्तरकुरू या नर्मदोत्तर देशांतून दक्षिणेंत आले, या बाबीला प्रत्यंतर पुरावा भाषेचा देतां येतो. माहाराष्ट्रिकां संबंधानें एवढें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं ते यद्यपि मगधदेशीय महाराजाचे म्हणजे अधिपतींचे अनुयायी होते तत्रापि ते मूळचे मगधदेशांतील रहाणारे नव्हत. ते मूळचे हिमालयापलीकडे देवांच्या अनुषंगानें राहणारे जे देवयोनि व गणदेव त्यांपैकीं होते. त्यांची मूळभाषा वैदिक भाषेच्या समकालीन अशी एक उपभाषा होती व त्यांना माहाराजिक अशी संज्ञा होती. मगधांत आल्यावर मगधदेशांतील प्राकृत जनांच्या भाषेंतील कांहीं लकबा त्यांनीं उचलल्या. वैराष्ट्रिक हेहि मूळचे हिमालयापलीकडील लोक होते व ते पंजाबांतील मत्स्यदेशांत विराटराजांचे पुढें राष्ट्रिक बनले. राष्ट्रिक हे लोक कुरूपांचालांतील होते व ते आपली भाषा घेऊन दक्षिणेंत उतरले. वैराष्ट्रिकांची भाषा जीस पुढें सौरसेनी म्हणून नांव पडलें ती होती. असे हे तीन लोक आपापल्या भाषा घेऊन दक्षिणेंत उतरले.

**इतर चार भाषांमुळें महाराष्ट्री भाषेचें रूपांतर**

वसाहतकारांत वजनानें व कर्तबगारीनें माहाराष्ट्रिक लोक सर्वांहून वरचढ असल्यामुळें त्यांच्या भाषेपुढें इतरांच्या भाषा फिक्या पडल्या, तत्रापि त्यांच्या भाषांतील काहीं लकबा महाराष्ट्रिकांच्या भाषेला चिकटल्याशिवाय राहिल्या नाहीत. वैराष्ट्रिकांच्या, राष्ट्रिकांच्या व मगधांच्या भाषांच्या माहाराष्ट्रिकांच्या महाराष्ट्री भाषेवर परिणाम होऊन त्यापासून काय फल झालें तें उदाहरणार्थ कित्येक शब्द देऊन स्पष्ट करतों. संस्कृत ‘रत्न’ या शब्दाचें महाराष्ट्रींत रूप रअण होतें. परंतु महाराष्ट्रीपासून निघालेल्या मराठींत लेणें असें रूप प्रचलित आहे. येथें असा प्रश्न येतो कीं, रत्न शब्दांतला संस्कृत र चा र च ठेवणारी महाराष्ट्री मराठी होतांना रचा ल काय म्हणून

करत्ये? प्रश्नाला उत्तर असें: मागधींत संस्कृत रच्या स्थानीं ल नियमानें होई. इतक्या नियमानें कीं र हा उच्चारच मुळीं मागधींत नव्हता. सबब, संस्कृत रत्न शब्दांतील रच्या स्थानीं मागधी ल उच्चार करी. महाराष्ट्रीची मराठी होतांना मगधांतील लोकांच्या संमतीनें रअण हा उच्चार लअण = लयण = लइण = लेणें असा मराठींत लकारयुक्त झाला. लयन (रहाण्याची जागा) पासून निघालेला लेणें हा मराठी शब्द रत्नापासून निघालेल्या लेणें या शब्दातून निराळा, हें लक्षांत ठेवावें. संस्कृत षचा महाराष्ट्रींत स किंवा ह होतो. विषय = विसअ. परंतु, मराठींत विषये ह्या सप्तम्यन्त शब्दाच्या ऐवजी विशीं असा उच्चार येतो. महाराष्ट्री स च्या ऐवजी मराठींत हा श कसा अला? तर, मागधींत स व ष हे उच्चारच मुळीं नाहींत. माहाराष्ट्रींतून मराठींत येतांना विसअम्मि या रूपांतील स चा श मागधी भाषा बोलणाऱ्यांच्या संगतींनें झाला हें उघड आहे. सध्यां मराठींत हंसी = हंशी, माउस्सिआ=माउशी, असा-अश्यास, ठसा-ठश्यास, पास-पाशीं, फास-फाशीं, इत्यादि ठिकाणीं जो शिकार शिष्टांच्या बोलण्यांत येतो तो आणि सामान्य लोकांच्या बोलण्यांत ष च्या ऐवजीं जो श ऐकूं येतो तो हे दोन्ही ठिकाणचे श महाराष्ट्रीची मराठी होतांना मागधीची जी संगती लागली तिचीं चिन्हें आहेत. य मुळें श उच्चार होतो. वगैरे कारणें वरवरचीं केवळ साहचर्य दाखविणारी विधानें होत; उच्चाराच्या बदलाचीं खरीं कारणें नव्हत. महाराष्ट्री मराठीचें रूप घेत असतां, मागधीचा तिच्यावर जो परिणाम झाला त्याचीं अशी आणीक शेकडों उदाहरणें देतां येतील. त्यांवरून माहाराष्ट्रिक लोक एके काळीं मगधदेशांत वसती करून होते या विधानाला पोषक असें एक भाषिक कारण उपलब्ध होतें.

राष्ट्रिकांचीं जी सौरसेनी भाषा तिचाहि महाराष्ट्रीवर परिणाम झालेला आहे, हें मराठीवरून ताडितां येतें. महाराष्ट्रींत सर्वस्माद व्यंजनात परः पूर्वस्थश्च रेफोलोप्यो भवति (चंड). परंतु सौरसेनींत तसा प्रकार होतोच असें नाहीं. उदाहरणार्थ, सौरसेनींत मूर्खचा अपभ्रंश विकल्पानें मुरूख्ख असा होतो, रचा लोप होत नाहीं. महाराष्ट्रीची मराठी बनतांना मुरूख्ख या रूपाचा अपभ्रंश मुलूख असा होऊन, मुलूख असा शब्द निष्पन्न झाला व तो "तो साऱ्या मुलखाचा शहाणा आहे" ह्या मराठींत आढळतो. येथें मुलखाचा म्हणजे मूर्खाणाम असा अर्थ आहे. मुलूख म्हणजे प्रांत असा अर्थ नाहीं. मुलूख म्हणजे प्रांत हा अरबी शब्द आहे. तो साऱ्या मुलखाचा शहाणा आहे या वाक्याचें शब्दशः संस्कृत भाषांतर 'स सर्वेषां मूर्खाणां विचक्षणः अस्ति' असें आहे. फारसी मुलूख शब्द या वाक्यांत अभिप्रेत असता तर मुलखांतला असा प्रयोग शक्य होतो, मुलखाचा असा चांत प्रयोग शक्य नव्हता. येथें सौरसेनींत लकब महाराष्ट्रीनें मराठी बनतांना उचलली हें उघड आहे.

महाराष्ट्रींत व सौरसेनींत विशेष व उत्कट अंतर नसल्यामुळें दक्षिणारण्यांत त्या दोघींचा मिलाफ होण्यास फारश्या यातना पडल्या नाहींत.

महाराष्ट्री मराठी होत असतांना अपभ्रंशाच्या ज्या कित्येक लकबा तिनें उचलल्या त्यांपैकीं एकीचा येथें उल्लेख करितों. 'अपभ्रंशे अधो रेफस्य लोपो न भवति' म्हणून चंड सांगतो. महाराष्ट्रींत अधो-रेफाचा लोप होतो. व्याघ्रः हा शब्द अपभ्रंशांत, म्हणजे चंडकालीन अपभ्रंशांत, वाघ्रो अस होत असे. मराठींत महाराष्ट्रीतून आलेलें वाघ असें रूप असून, शिवाय अपभ्रंशांच्या संगतीनें अधोरेफयुक्त वाघ्रू असें रूप अशिष्ट व ग्राम्य जनांत आढळतें.

तात्पर्य, महाराष्ट्री भाषा ही जरी मराठीची मुख्य जननी आहे तरी तिनें अधूनमधून सौरसेनी, मागधी, अपभ्रंश व पैशाची या दायांचें दूध चाखिलें आहे. आणि ह्यांचें विशेष आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. माहाराष्ट्रिक, राष्ट्रिक व वैराष्ट्रिक हे लोक मगध, कुरू, पांचाल, मत्स्य व उत्तरकुरू इत्यादि उत्तरेकडील देशांतून दक्षिणेंत आले असल्यामुळें त्या त्या देशांतील भाषांच्या लकबा माहाराष्ट्री मराठी होत असतांना तिच्या आंगळवणीं पडाव्या हें साहजिक आहे. शिष्ट मराठी खेरीज महाराष्ट्रांत सध्यां ज्या प्रांतिक व जातिक उपभाषा आहेत त्या उत्तरेकडून वसाहत करण्यास आलेल्या त्या त्या उत्तरप्रांतीय जातींच्या भाषांपासून निघालेल्या आहेत, हें त्या त्या प्रांतिक व जातिक उपभाषांच्या विशिष्ट लकबांवरून ओळखतां येतें.

**वसाहतकारांचे पुरोहित उत्तर हिंदुस्थानचे**

महाराष्ट्रिक, राष्ट्रिक व वैराष्ट्रिक लोक उत्तरेकडील देशांतून आले या बाबीला दुसरा प्रत्यंतर पुरावा माहाराष्ट्रिकादि लोकांच्या पुरोहितांच्या शाखा व गोत्रें ऊर्फ आडनांवें यांच्यामध्यें सांपडतो. माहाराष्ट्रादिक लोक वैदिकधर्मी पडल्यामुळें, यज्ञयागार्थ त्यांनीं आपले पुरोहितहि आपल्या बरोबर वसाहतींत आणिले. सध्यां महाराष्ट्रांत, नागपूर, वऱ्हाड, खानदेश, नाशिक, औरंगाबाद, बीड, सातारा, वगैरे प्रांतांत यजुर्वेदी ब्राह्मणांची संख्या बहुतम आहे, त्यांच्या खालोखाल ऋग्वेद्यांचा भरणा आहे आणि त्याच्या खालीं काण्व, मैत्रायणीय, इत्यादि शाखांची वसती आहे. सामवेदी व अथर्ववेदी ब्राह्मण महाराष्ट्रांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतके असतील नसतील. माहाराष्ट्रिकादि लोक मगध, कुरू, पांचाल, मत्स्य, उत्तरकुरू व उत्तरमद्र या देशांतून आले, तेव्हां त्यांचे पुरोहितहि त्याच देशांतून आले असले पाहिजेत हें सांगणें नलगें. करतां

नर्मदोत्तर प्रदेशांत सध्यां कोणत्या शाखांचा ब्राह्मणांचा भरणा कोणत्या देशांत विशेष आहे तें पाहूं. त्या त्या प्रांतांत त्या त्या शाखा पुरातनकालापासून अभिजन आहेत असें धरून ही पाहणी करावयाची आहे. काश्मीर हा अर्वाचीन देश म्हणजे ऐतरेय ब्राह्मणकालीन उत्तरकुरू व उत्तरमद्र ह्या देशांचा दक्षिण भाग आहे. ह्या देशांतील ब्राह्मण कृष्णयजुर्वेदी, कठशाखी व लौगाक्षिसूत्री आहेत. ह्यांच्यांत जीं आडनांवें सध्यां प्रचलित आहेत त्यांपैकीं कांहीं तत्सदृश्य मराठी आडनांवांसह देतों:-

| काश्मिरी | मराठी | काश्मिरी | मराठी |
|---|---|---|---|
| 1 भैरव | बेहरे | 9 छात्री | छत्रे |
| 2 भूत | भुते | 10 बास | व्यास |
| 3 त्रकारी | टकारे | 11 वारिकी | वारके |
| 4 वैष्णव | वैष्णव | 12 डुली | डुले |
| 5 भट | भट | 13 पांडे | पांडे |
| 6 राख्यस | राक्षे | 14 विचारी | विचारे |
| 7 काली | काळे | 15 चंद्र | चंद्रे |
| 8 बंगी | बंगी | | |

सध्यांचा पंजाब म्हणजे प्राचीन मत्स्यदेशाचा कांहीं भाग. त्यांतील सर्व सारस्वतब्राह्मण शुक्लयजुर्वेदी व माध्यंदिनशाखी आहेत. त्यांचीं कांहीं आंडनावें येणें प्रमाणें:

| | | |
|---|---|---|
| 1 नवले | 21 भारथे | 41 आचारिये |
| 2 रवडे | 22 ऋषि | 42 डोकरे |
| 3 पंडित | 23 ब्रह्मी | 43 केसर |
| 4 तिखे | 24 भिंडे | 44 लाट |
| 5 बागे | 25 भूत | 45 प्रोहित |
| 6 मालिये | 26 ओझे | 46 बलिये |
| 7 काळिये | 27 पाध्ये | 47 सुखे |

| | | |
|---|---|---|
| 8 कपूरिये | 28 तोटे | 48 भुरे |
| 9 पाठक | 29 मढरे | 49 सांगड |
| 10 भारद्वाजी | 30 भटारे | 50 मुंडे |
| 11 जोशी | 31 व्यास | 51 उपाध्ये |
| 12 दत्त | 32 मैत्र | 52 घोडे |
| 13 वैद्य | 33 लट्टू | 53 गुहलिये |
| 14 श्यामे | 34 अग्निहोत्री | 54 सिरखंडिये |
| 15 कटपळे | 35 कोटपाल | 55 किरले |
| 16 घोटके | 36 सुंदर | 56 गोसाई |
| 17 पराशर | 37 पांडे | 57 गोकुलिये |
| 18 कपाल | 38 गांडे | 58 कवडे |
| 19 नागे | 39 तगाले | 59 रोड |
| 20 वसिष्ठ | 40 दीक्षित | 60 जड |

वरील यादींतील पंजाबी सारस्वत ब्राह्मणांच्या नांवांशीं तत्सदृश्य माहाराष्ट्रीय ब्राह्मणांच्या नांवांची समांतर याद वाचकांना सहज सुचण्यासारखी असल्यामुळें ती येथें देत नाहीं. सिंधप्रांतांतील ब्राह्मण शुक्लययुर्वेदी व माध्यंदिनशाखी आहेत. कान्यकुब्जांतील मिश्र ब्राह्मणांपैकी बहुतेक शुक्लयजुर्वेदी व काण्वशाखी आहेत. आणि थोडे ऋग्वेदी आहेत. त्यांच्यांत गर्ग, अवस्थि, बाला, गौतमी, तारा, करवय, इत्यादि आडनांवें आहेत. कान्यकुब्जांतील डुबे ब्राह्मण बहुतेक शुक्लयजुर्वेदी, काण्वशाखी व गोभिलसूत्री असून, कांहीं थोडे सामवेदी आहेत. त्याच देशांतील पाठक ब्राह्मण यजुर्वेदी आहेत. तसेंच तेथील चोबे व दीक्षित ब्राह्मण ययुर्वेदी माध्यंदिन आहेत. रजपुतान्यांतील पोखर सेवग ब्राह्मण, जयपुरांतील पारिख ब्राह्मण, मारवाडांतील दायिम ब्राह्मण, सर्व यजुर्वेदी माध्यंदिन आहेत. व मिश्र ब्राह्मण यजुर्वेदी व सामवेदी असे दोन वेदांचे आहेत. नेपाळांतील ब्राह्मण यजुर्वेदी असून त्यांच्यांत भट्ट, आचार्य, पर्वत्य, अधिकारी, पंडित, इत्यादि आडनांवें आहेत. गुर्जर ब्राह्मण ऋग्यजुःसाम असे तीनवेदी आहेत. वंग ब्राह्मणांत सामवेदी फार. कलिंग ब्राह्मण शुक्लयजुर्वेदी काण्व असून, ओड देशांतील नंद ब्राह्मणांची नंदभाषाहि त्यांजबरोबर महाराष्ट्रांत आली. हे नंद ब्राह्मण प्रतिष्ठानीं सराफी करून असत. ह्या यादीवरून स्पष्टच झालें कीं काश्मीरपासून मगधापर्यंतचा सर्व मुलूख शुक्लयजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मणांनीं भरलेला असून,

त्यांत ऋग्वेदी व सामवेदी ब्राह्मणांची तुरळक वसती आहे व काण्वांचीहि थोडीबहुत संख्या आहे. हे माध्यंदिन, काण्व व ऋग्वेदी ब्राह्मण माहाराष्ट्रिक, राष्ट्रिक व वैराष्ट्रिक क्षत्रियांबरोबर दक्षिणेंत आले.

पैकीं विदर्भांत यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण बाहुल्यानें आहेत. ह्यांचा उल्लेख त्रिविक्रमभट्टानें शतपथिनः म्हणून नलदमयंती चंपूत केला आहे. नागपूरप्रांतीं झाडे ब्राह्मण माध्यंदिनशाखो व काण्वशाखी असे दोन्हीं शाखांचे आहेत. खानदेश, नाशिक, पंढरपूर, इकडेहि माध्यंदिन ब्राह्मण सडकून आहेत. तात्पर्य, माहाराष्ट्रांत शुक्लयजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मणांची संख्या सर्वांहून जास्त आहे. ऋग्वेदी, काण्व व आपस्तंब यांच्या अल्पसंख्येची तुलना माध्यंदिनांच्या प्रचंड संख्येशीं केली म्हणजे माहाराष्ट्र हा देश भूरित्वानें माध्यंदिनाचा आहे, असें म्हणणें भाग पडतें. माध्यंदिनांत काण्वांची भर टाकिली म्हणजे ही शुक्लयजुर्वेद्यांची संख्या त्याहूनहि मोठी होत्ये. शुक्लयजुर्वेद्यांच्या वाजसनेयी संहितेचा मूळ उत्पादक याज्ञवल्क्य असल्यामुळें, तत्प्रणीत धर्मदिसूत्रें त्यांनीं महाराष्ट्रांत वसाहतकाळीं आणिलीं. दक्षिणेंत याज्ञवल्क्य स्मृती प्रमाण धरतात त्याचें मुख्य कारण, महाराष्ट्रांतील शुक्लयजुर्वेदी ब्राह्मणांची बहुमत संख्या व ह्या ब्राह्मणांचे अनुयायी जे माहाराष्ट्रिकादि क्षत्रिय त्यांची संख्या वाजसनेय शाखेची अनुयायी आहे, हें आहे. येणेंप्रमाणें भाषेचा प्रमाणावरून व वेदशाखाच्या प्रमाणांवरून निश्चित झालें कीं माहाराष्ट्रिकादि लोक व त्यांचे वाजसनेयादि पुरोहित काश्मीरपासून मगधपर्यंतच्या उत्तरहिंदुस्थानांतील देशांतून बौध्दक्रांतिकालांत दक्षिणेंत उतरले.

**बौध्दक्रांतिकालीं महाराष्ट्रांत उतरलेले दुसरे अनेक जन**

उत्तरहिंदुस्थानांतून बौध्दक्रांतिकालीं माहाराष्ट्रिकादि लोकांबरोबर आणीकहि कांही लोक दक्षिणेंत उतरलें. त्यांचीं नांवें अशोकानें आपल्या शिलालेखांत दिलीं आहेत. ते लोक म्हणजे भोज, पेतेनिक, सतियपुत, केरलपुत, पांड्य, व चोल हे होतपैकी भोज म्हणजे ऐतरेयब्राह्मणाच्या अडतिसाव्या अध्यायांत “दक्षिणस्यां दिशि ये के च सत्वतां राजानो भौज्यायैव ते अभिषिच्यंते भोजेति एनान अभिषिक्तान आचक्षते” म्हणून ज्यांचें वर्णन केले आहे ते लोक होत. कुरूपांचालाच्या दक्षिणेस जो मथुरा प्रांत आहे तो ह्या सत्वत लोकांच्या भोज नांवाच्या राजांचा देश होय. हे भोज लोक दक्षिणापथांतील विदर्भदेशांत वसाहत करून राहिले. म्हणजें विदर्भांतील

भोज लोक मथुरावृंदावनाकडील उत्तरहिंदुस्थानांतील लोक होत हें स्पष्ट झालें. ह्या संस्कृत भोज शब्दाला स्वार्थक ल प्रत्यय लागून मराठी भोजले-भोसले हा सुप्रसिध्द शब्द झाला.

पेतेनिक म्हणजे प्रतिष्ठानक लोक मूळचे प्रयागाच्या समोरील जुनाट प्रतिष्ठान शहरचे व प्रांतांतलें राहणारे लोक. प्रयागाजवळच्या प्रतिष्ठान प्रांतांतील ह्या लोकांनीं दक्षिणेंत गोदावरी - तीरीं येऊन प्रतिष्ठान ऊर्फ पैठाण हा प्रांत व शहर स्थापून ह्या शहरांत व प्रांतांत वसति केली. म्हणजे हे प्रतिष्ठानकहि लोके उत्तरहिंदुस्थानांतील होत. सतियपुत म्हणजे सत्वत्पुत्र. मथुरावृंदावनप्रांतांतील भोज हे ज्या सत्वत लोकांचे राजे त्या सत्वत लोकांपासून सत्वपुत्रांची ऊर्फ सतियपुतांची उत्पत्ति झाली. ह्या सतियपुतांची वसति सांवतवाडी म्हणजे सत्वद्वाटिका प्रांतांत होती. एवंच, हे सतियपुतहि उत्तरेकडीलच लोक होत.

सतियपुतांप्रमाणेंच केरलपुतहि उत्तरेकडूनच मलबारांत कोंकणांतून उतरले. कुरूदेशाच्या उत्तरेस अतिनिकट कुलिंद देश होता त्याच्या शेजारीं केरल देश प्राचीनकाळीं होता. केरलदेशच्या सुधार्मिक राजाचा पुत्र चंद्रहास त्याची कथा आबालवृध्दांस महशूर आहे. ह्या उत्तरहिंदुस्थानांतील केरलदेशांतून निघून केरलपुत ह्या लोकांनी दक्षिणेंत मलबारकिनाऱ्यावर वसाहत केली व त्या वसाहतीला केरल हें नांव दिलें. केरलांप्रमाणेंच चोल हे उत्तरेकडील लोक होते. पैशाची भाषेंच्या एका पोटभेदाला चूलिकापैशाची असें नांव आहे. ह्या उत्तरेकडील चूलिका देशांतील चोल ऊर्फ प्राकृत चोल, चोळ लोकांनीं दक्षिणेंत वसति करून आपल्या वसाहतीला चोल हें अभिधान दिलें. पांडय हे उत्तरहिंदुस्थानांतील कुरूदेशाशेजारील पांडुराष्ट्रांतील पांडुलोकांचे वंशज होत. कात्यायन पांडोडर्यण ह्या वार्तिकांत ह्या पांडुदेशाचा उध्दार करतो. पांडुराष्ट्रांतील पांडुलोकांचे वंशज जे पांडय त्यांनीं दक्षिणेंत येऊन वसाहत केली व त्या वसाहतीला पांडय हें नांव दिलें. पांडय, चोल, केरल, सत्वत्पुत्र, भोज, पेतेनिक वगैरे लोकांच्या हकीकतींशीं सध्यां आपणांस कांही कर्तव्य नाहीं. फक्त राष्ट्रिक हें पद ज्यांच्या नांवांत येतें त्या राष्ट्रिक, वैराष्ट्रिक व विशेषतः माहाराष्ट्रिक लोकांसंबंधानें आपणास येथें विचार कर्तव्य आहे.

ह्या माहाराष्ट्रिक लोकांना माहाराष्टकहि म्हणत व असें दिसतें कीं माहाराष्टहि म्हणत. राष्ट्रिक, वैराष्ट्रिक ह्या लोकांत वजनानें व कर्तबगारीनें माहाराष्ट्र लोक प्रमुख असल्यामुळें, “स एषां ग्रामणीः” ह्या सूत्रांत सांगितलेल्या रिवाजाप्रमाणें ह्या साऱ्यांना माहाराष्ट्रक अशी संज्ञा

कालांतरानें प्रचलित झाली. माहाराष्ट्रिकांना माहाराष्ट्रिन असेंहि नांव असे. माहाराष्ट्रिन या शब्दाचें प्राकृत रूप महारठिणी हें भोजें, बेडसें व कालें येथील कांहीं शिलालेखांत येतें. तात्पर्य, माहाराष्ट्र, माहाराष्ट्रक, माहाराष्ट्रिक व माहाराष्ट्रिन या नांवावरून ह्यांच्या स्त्रियांना जसें माहाराष्ट्रिणी, महारठिणी हें नांव पडलें, तसेंच ह्यांच्या माहाराष्ट्र या नांवावरून ह्यांच्या भाषेला माहाराष्ट्री असें प्रथम नांव पडलें. माहाराष्ट्री ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश महरट्टी असा होऊन त्याचें पुनः संस्कृतीकरण महाराष्ट्री असें झालें. महाराष्ट्री असा उच्चार सर्व प्राकृत वैय्याकरण निरपवाद देतात.

**माहाराष्ट्रिकांची प्राचीन संस्कृती**

महाराष्ट्रि भाषा बोलणारे हे माहाराष्ट्रिक लोक बौध्दक्रांतिकालीं जेव्हां दक्षिणेंत उतरले तेव्हां ह्यांची संस्कृति कोणत्या दर्जाची होती तें आतां पाहूं. ह्यांच्या संस्कृतीचें परीक्षण राजकीयदृष्ट्या, समाजदृष्ट्या व भाषादृष्ट्या अश्या तीन दृष्ट्यांनीं करतां येण्यास साधनें आहेत. महरट्ट ऊर्फ माहाराष्ट्रिक लोक चातुर्वर्ण्यबध्द असून, पुरोहितांखेरीज त्यांचें एक पाऊलहि पुढें पडत नसे. झल्ल, मल्ल, निच्छिवि, नट, इत्यादींच्या सारखे ते सावित्रीपतित व्रात्यहि झालेले नव्हते व ओड्र, द्रविड, कांबोज, इत्यादींच्या प्रमाणें ब्राह्मणादर्शनानें ते शूद्रहि बनले नव्हते. उत्तरहिंदुस्थानांतील व्रात्य व शूद्रप्राय अश्या पाखंडमतानुयायी क्षत्रियांच्या जुलमाला कंटाळून ते दक्षिणेंत आले होते. मातृसावर्ण्याचा कायदा पसार होण्याच्यापूर्वी त्यांच्यांत शूद्रभार्योत्पन्न निकृष्ट क्षत्रियांची भरती इतर वर्णांच्या प्रमाणेंच होऊन गेलेली होती; ती तो कायदा पसार झाल्यावर कायदेशीर रीतीनें बंद झाली. परंतु बेकायदेशीर रीतीनें चालूं असली तत्रापि त्या बेकायदेशीर संबंधापासून होणाऱ्या प्रजेच्या पृथक जाती बनूं लागल्यामुळें शुध्द क्षत्रियत्वाला त्यापासून बट्टा लागण्याचा संभव नव्हता. माहाराष्ट्रिक आपली उपजीविका मगधांत आयुधांवरती करीत म्हणजे ते आयुधोपजीवी ऊर्फ शस्त्रोपजीवी संघ होते. मगधांतील महाराजांचे ते गण होते म्हणजे भाडोत्री सैनिक होते.

ह्या शस्त्रोपजीवी संघांत मूळ अशी चाल होती की, गणांतील सर्व स्त्रिया गणांतील सर्व पुरूषांना सामान्य असत व ह्या गणांतील स्त्रियांना गणिका म्हणत. गणिका म्हणजे विश्वयोषिता, हा अर्वाचिन अर्थ ऐथें घ्यावयाचा नाहीं. गणिका म्हणजे गणांतील सर्वांना सामान्य

असणाऱ्या सर्व स्त्रिया एवढाच अर्थ येथें विवक्षित आहे. ह्या गणांतील गणांनीं गणांतील स्त्रियांशीं केलेल्या प्रणयविधीची वर्णनें गाथासप्तशतींत आलेलीं आहेत. त्यांवरून स्पष्ट दिसतें कीं ह्या गणसंघांत स्त्रियांचें दांपत्यनियमन विशेष दृढ नसून, बरेंच सैल होतें. ह्या स्त्रीपुरूषसंबंधाच्या बाबींत मगधांतील जे महाराजशब्दधारी क्षत्रिय त्यांच्याहून हे माहाराष्ट्रिक गण बरेच प्राचीन म्हणजे मागासलेले होते. तत्रापि मगधांतील शिष्ट क्षत्रियांच्या व ब्राह्मणांच्या सान्निध्यानें त्यांच्यांतील स्त्रीपुरुषसंबंधांतील हें शैथिल्य आस्तेआस्ते क्षय पावून वैयक्तिक पतिपत्नीत्वाची चाल त्यांच्यांत रूजत होती.

माहाराष्ट्रिक लोक मूळचे इंद्र, अग्नि, इत्यादींचे भक्त असून, बौध्दकालीं जेव्हां शिव, विष्णु, इत्यादि स्थापना ब्राहमणांनीं केली तेव्हां ह्या नवीन देवांचेहि ते भक्त बनले. महाराष्ट्रिकांची सामाजिक, धार्मिक, व कौटुंबिक स्थिति ही अशी प्राथमावस्थिक होती.

**त्यांचीं गणराज्यें**

त्यांची राजकीय घटनाहि ह्या प्राथमिक अवस्थेहून फारशी दूर नव्हती. मगधांत व मगधाच्या जवळील चेदि वगैरे प्रांतांत असतांना, झल्ल, मल्ल, निच्छिवि, शाक्य, नट, इत्यादि व्रात्यांच्यांतल्या प्रमाणेंच ह्यांच्यांतहि गण म्हणून जी राजकीय संस्था ती प्रचलित होती. ह्या गणनात्मक राजकीय संस्थेंत गणांतील सर्वच पुरूषव्यक्ति राजे असत व सर्व व्यक्ति आपणास राजा ह्या पदानें भूषवीत. सध्यां शहाण्णव कुळांतील सर्व मराठे आपणास व्यक्तिशः राजे म्हणवितात त्याचें कारण त्यांच्या प्राचीन पूर्वजांतील ही गणराज्याची संस्था होय. गणराज्य तीन प्रकाराचें असे. एका प्रकारांत गणांतील सर्व व्यक्ती अधिकार चालवीत. ह्या प्रकाराला बहुनायकी गणराज्य म्हटलें असतां चालेल. दुसऱ्या प्रकारांत कांही प्रमुख व्यक्तींच्या हातीं राज्याधिकार सोंपविलेला असे. ह्याला महाजनकी गणराज्य हें नांव शोभण्यासारखें आहे. आणि तिसऱ्या प्रकारांत एका सर्वश्रेष्ठ व्यक्तीला सर्वाधिकारी करीत. ह्याला एकराज्य म्हणणें रास्त आहे. हे तिन्हीं प्रकार माहाराष्ट्रिक लोकांत प्रचलित होते. आणि हे तिन्हीं प्रकार घेऊन माहाराष्ट्रिक दक्षिणेंत उतरलें.

आंध्रभृत्यकालीं ही गणसंस्था माहाराष्ट्रिकांत होती. नाणेघांटांतील आंध्रभृत्यांच्या भित्तिचित्रांतील एका चित्राखालील महारठिगनकयिरो ही अक्षरें सुप्रसिध्द आहेत.

माहाराष्ट्रिकगणकवीर: या सामासिक पदांत एकनायकी गणराज्यापेक्षां बहुनायकी गणराज्याचा ध्वनि ऐकूं येतो. समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद येथील स्तंभावर व्याघ्रराज, नीलराज, कुबेर, मंटराज, इत्यादि राजांचीं नांवे आलीं आहेत, तीं जर माहाराष्ट्रिकांचीं असतील तर त्यावरून दिसतें कीं शालिवाहनाच्या तिसऱ्या चवथ्या शतकांत दक्षिणेंत एकनायकी गणराज्यें बनून गेलीं होतीं व बहुनायकी गणराज्यें अस्तास गेलीं होती. तात्पर्य, शकोत्तर चारशेंपर्यंत माहाराष्ट्रिकांत गणराज्यसंस्था, एकनायकी किंवा बहुनायकी, प्रचलित होती. ही गणराज्यसंस्था माहाराष्ट्रिकांनी नवीन शोधून काढून प्रचलित केली असा समज करून घेण्याचें कारण नाहीं. ही संस्था माहाराष्ट्रिक जेव्हां माहाराजिक होते तेव्हांपासून त्यांच्यांत प्रचलित होती.

देवयोनि व गणदेवता यांच्यांत गणराज्यसंस्था फार प्राचीन काळापासून विद्यमान होती. तसेंच प्राचीन ऋषींमध्येंहि ही संस्था अस्तित्वांत होती. ही गणराज्यसंस्था इतकी प्राचीन आहे कीं ऋग्वेदकालीन ऋषींनीं हिचें हृदयंगम वर्णन केलें आहे.

**ब्रह्मणस्पति गणप्रमुख**

ऋग्वेदाच्या दुसऱ्या मंडळांत ब्रह्मणस्पतीचीं सूक्तें ऊर्फ सुवर्णनें दिली आहेत त्यांत गणसंस्थेचा राजा तो गणराज ऊर्फ ब्रह्मणस्पति त्याच्या सामर्थ्याचें कीर्तन केलेलें आहे. गणानां त्वा गणपतिं हा मंत्र विख्यात आहे. संस्कारादि कार्यांत प्रथमतः गणपतीचें अवाहन या मंत्रांनें याज्ञिक करतात. परंतु, ह्या मंत्रांत कोणाचें व कशाचें वर्णन आहे. एतद्विषयीं त्यांच्या कल्पना विचित्र आहेत. त्यांच्याच तेवढया कल्पना विचित्र आहेत असें नव्हे, तर सायणाच्याहि कल्पना अशाच विचित्र आहेत. हे लोक ब्रह्मणस्पतीला देव समजतात. वस्तुतः ब्रह्मणस्पति म्हणजे ब्रह्मन यांचा मुख्य पुढारी असा अर्थ ऋग्वेदकालीं म्हणजे हें ब्राह्मणस्पत्य सूक्त मूळ रचिलें गेलें त्या काळीं होता.

अंत्योदात्त ब्रह्मन (पुं.) शब्दाचा अर्थ स्तुति करणारा, स्तावक असा आहे व आद्योदात्त ब्रह्मन (नपुं.) शब्दाचा अर्थ स्तुति, स्तवन असा आहे. आद्योदांत ब्रह्मन शब्द घेतला, तर ब्रह्मणस्पति या शब्दाचा अर्थ स्तुतीचा पति असा होतो. ह्या अर्थापासून कांहीं बोध होत नसल्यामुळें, सायणानें ब्रह्मन (नपुं.) ह्या शब्दाचा अन्न असा अर्थ निघंटूतून घेतला व ब्रह्मणस्पति म्हणजे अन्नाचा पालन करणारा असा अर्थ केला. असा कांहीं तरी अर्थ केल्यावांचून

त्याला गत्यंतर नव्हतें असें मात्र म्हणतां येत नाहीं. ब्रह्मणस्पते ह्या संबोधनांत सर्व पदें अनुदात्त आहेत. तेव्हां ब्रह्मणस्पते या संबोधनांत ब्रह्मण: हें पद अंत्योदात्त किंवा आद्योदात्त असें वाटेल तसें घेतां आलें असतें. परंतु येथें परंपरागत संहितापाठ व स्वरप्रक्रिया त्याच्या आड आली. ब्रह्मणस्पति ह्या सामासिक शब्दांतील दोन्हीं पदें आद्योदात्त असें वाटेल तसें घेतां आलें असतें. परंतु येथें परंपरागत संहितापाठ व स्वरप्रक्रिया त्याच्या आड आली. ब्रह्मणस्पति ह्या सामासिक शब्दांतील दोन्हीं पदें अद्योदात्त आहेत असें स्वरप्रक्रिया सांगते. तेव्हां आद्योदात्त ब्रह्मन शब्द स्वीकारून त्याचा अर्थ स्तुति किंवा अन्न करण्याखेरीज दुसरी तोड सायणाला सुचण्यासारखी नव्हती. संहिता ज्यांनीं संपादिली ते लोक व संहिता प्रमाण धरून ज्यांनीं स्वरप्रक्रिया रचिली ते वैयाकरण मूळ ऋग्वेदरचनाकाळापासून अत्यंत दूर पडल्याकारणानें ह्या ऋचेंतील ब्रह्मणां ह्या पदाचे व ब्रह्मणस्पति ह्या सामासिक शब्दाचे स्वर देण्यास चुकले असतील, असा संशय सायणाला येणें शक्य नव्हतें. परंतु, संस्थाचे इतिहास जाणणारे आधुनिक जे आपण त्यांना असें स्पष्ट दिसत आहे कीं, ह्या ऋचेंतील ब्रह्मणां हें पद अंत्योदात्त आहे व ब्रह्मन हा शब्द ब्रह्मणां व ब्रह्मणस्पते या दोन्हीं स्थलीं पुल्लिंगी आहे. एणेंप्रमाणें ब्रह्मन हा शब्द पुल्लिंगी घेतला म्हणजे ह्या ऋचेचा अन्वय व अर्थ असा लागतो -

ऋचा

गणानां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनां उपमश्रवस्तमम॥
ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पते आ नः श्रृण्वन्न ऊतिभिः सीद सादनम ॥ 1 ॥

अन्वय

ब्रह्मणस्पते ! गणानां गणपतिं, कवीनां कविं, उपमश्रवस्तमं, ब्रह्मणां
ज्येष्ठराजं त्वा हवामहे । नः श्रृण्वन ऊतिभिः सादनं आसीद ।

अर्थ

हे स्तावकांच्या पुढाऱ्या ! गणांचा नायक, शहाण्यांचा शहाणा, ज्याचें
यश इतरांच्या यशाला अत्यन्त उपमानभूत होतें, स्तावकलोकांचा सर्व -
श्रेष्ठ राजा, असा जो तूं त्या तुला आम्हीं बोलावितो. आमचें ऐकून,
देणग्यासह आसंदीवर विराजमान हो.

ब्रह्मन लोकांत म्हणजे स्तावक असे जे ऋषि म्हणजे ब्राह्मण त्या लोकांत हें सूक्त रचण्याच्या काळीं गणसंख्या व गणराज्य म्हणून ज्यास म्हणतात ती संस्था विद्यमान होती. ह्या ऋषींच्या म्हणजे ब्राह्मणांच्या गणाच्या पुढाऱ्याला गणपति व ब्रह्मणस्पति अशा संज्ञा रूढ होऊन गेल्या होत्या. गणपति व ब्रह्मणस्पति अशा संज्ञा रूढ होऊन गेल्या होत्या. गणपति व ब्रह्मणस्पति हे शब्द संज्ञा बनल्याकारणानें, सभेचा सभापति व देशाचा भूपति किंवा गांवचा गावुंडा हे शब्द पुनरूक्तीला न जुमानतां ज्याप्रमाणें सध्यां आपण योजितो त्याप्रमाणें गणानां गणपतिं व ब्रह्मणां ब्रह्मणस्पतिं हे शब्द पुनरूक्तीला न जुमानतां योजिले जात. ह्या ब्रह्मगणांत सर्व व्यक्ति राजशब्दोपजीवी असत. पैकीं सर्वांत वयानें, अनुभवानें, शहाणपणानें व यशस्वी कृत्यांनीं जो ज्येष्ठ त्याला ज्येष्ठराज म्हणत, व त्याच्या हुकुमतीखालीं सारे वागत. प्रायः ज्येष्ठराज सर्व ब्रह्मगणाचा साक्षात पिता असे (जनिता ब्रह्मणां असि).

ब्रह्मणस्पतीला दुसरी संज्ञा बृहस्पति म्हणून असे. बृह धातूला मन प्रत्यय लागून जसा ब्रह्मन शब्द होतो तसाच त्या धातूला अस प्रत्यय लागून बृहस शब्द त्याच अर्थानें होई. बृहस म्हणजे स्तावक, स्तुति करणारा. बृहस्पति ऊर्फ ब्रह्मणस्पति ऊर्फ गणपति ऊर्फ ज्येष्ठराज भीम (भयंकर), अभित्रदंभन, रक्षोहण असून तो ज्याना आपल्या संरक्षणाखाली घेई (यं रक्षसि ब्रह्मणस्पते) त्याला संकट शिवत नसे ( न तं अंहो न दुरितं अरातयः तितिरूः). तो शत्रूंना जाळणारा (निष्टप्ता शत्रुं), स्वजनांना मार्गांत रक्षण करणारा (पथिकृत) असे. ज्याला ज्याला म्हणून गणपतींचे साहाय्य मिळे (यं यं युजं कृणुते ब्रह्मणस्पतिः) तो तो शत्रूंचा विध्वंस करतो (वनुष्यतः वनवत). जो ब्रह्मणस्पतीला तुपाचीं पक्वान्नें नेऊन देतो (यो अस्मै हव्यैः धृतवभ्दिः अविधत) त्याला तो पूर्वेकडील देशांत विजयानें वसाहत करण्यास नेतो (तं प्राचा प्र नयति). तात्पर्य, गणांच्या पुढाऱ्याचा महिमा या सूत्रांत कवीनें वर्णिलेला आहे.

गणसंस्था व गणराज्य ज्या ब्रह्मगणांत रूढ झालें होतें त्यांच्यांत अशी चाल होती कीं गणांतील सर्व स्त्रिया गणपतीकडून प्रजोत्पादन करून घेण्यांत भूषण मानीत. एतत्संबंधानें यजुर्वेदाच्या वाजसनेयसंहितेचा तेतिसावा अध्याय पहावा. त्यांत गणांच्या गणपतीला स्त्रिया एणेंप्रमाणें आव्हान करतात -

**यजुः**

गणानां त्वा गणपति हवामहे

प्रियाणां त्वा प्रियपतिं हवामहे

निधीनां त्वा निधिपतिं हवामहे

वसो मम

आहं अजानि गर्भधम

आ त्वं अजासि गर्भधम

अर्थ

हे आमच्या गणांच्या पुढाऱ्या ! तुला आम्ही बोलावितों,

हे आमच्या प्रियांच्या प्रिय पुढाऱ्या ! तुला आम्ही बोलावितों,

हे आमच्या ठेव्यांच्या मुख्य ठेव्या ! तुला आम्हीं बोलावितों,

हे माझ्या वसू !

मी आपलें घबाड हलवितें किंवा ओढत्यें,

तूं आपलें घबाड हलब किंवा ओढ.

गर्भध = घबाड म्हणजे गर्भ धारण करण्याचा अवयव. गणपतिअथर्वशीर्षांत गणांच्या पुढाऱ्याचें रूप वर्णिलेलें आहे. गणांचा हा लढाऊ पुढारी हातांत पाश, अंकुश व हत्तीचा एक दात ही शस्त्रें घेऊन व तांबडी वस्त्रें लेऊन, शत्रूंचा धुव्वा उडवून देई. असा हा ब्रह्मन लोकांचा ऊर्फ ऋषींचा पुढारी जो ब्रह्मणस्पती ऊर्फ गणपति तो असे. त्याची आराधना प्रथम केल्यावांचून गणांतील गणांचें कोणतेंहि कृत्य निर्विघ्नपणें तडीस जाण्याचा संभव नसे. सबब कोणतेंहि लहानमोठें कृत्य करावयाच्या प्रारंभीं गणाच्या पुढाऱ्याचें साहाय्य प्रथम मिळवावें लागें. गणपतींचे आवाहन करण्याच्या ह्या प्राचीन चालींचें आपंण सध्यां नुसतें नाटकी अनुकरण करतों, परंतु प्राचीन काळीं जेव्हां गणराज्यसंस्था ब्रह्मन लोकांत प्रचलित होती तेव्हां गणाच्या प्रत्यक्ष पुढाऱ्याची कोणत्याहि कृत्याला संमति घ्यावी लागे, अशी ही प्राचीन गणराज्यसंस्था माहाराष्ट्रिक ऊर्फ महरट्ट लोकांत प्रचलित होती.

राज्य करण्याची ही अगदीं प्राथमिक पध्दति माहाराष्ट्रिक लोकांत असल्यामुळें ते जेव्हां दंडकारण्यांत वसाहती करण्यास आले, तेव्हां त्यांनीं नागपूरपासून तुंगभद्रेपर्यंतच्या प्रांतांत अक्षरक्षः

हजारों चिमकुलीं चिमुकलीं अशी गणराज्यें स्थापिलीं. बहुतेक प्रत्येक तर्फेला म्हणजे दहावीस मैल लांबीच्या प्रदेशाला एकेक गणराज्य असून, तेथील मुख्य राजधानीच्या गांवाला राजपुरी, राजुरी, रायरी, राजगड, रायगड अशीं नांवें असत. महाराष्ट्रांत राजपुऱ्या, राजुऱ्या, रायऱ्या, इत्यादि राज हें आद्याक्षर असणारीं जीं अनेक गांवें सांपडतात त्याचें कारण महरट्टांचीं ही प्राथमावस्थिक गणराज्यसंस्था होय.

माहाराष्ट्रिकांची राजकीय स्थिति ज्याप्रमाणें अगदी प्राथमावस्थिक होती त्याचप्रमाणें त्यांची भाषा जी महाराष्ट्री तीहि तितकीच प्राथमावस्थिक होती. संस्कृतांत जसें व्याकरण, धर्म, न्याय, मीमांसा, इतिहास, इत्यादि शाखांत विपुल व भव्य वाङःमय त्याकालीं होतें, तसें भव्य व विपुल वाङःमय महाराष्ट्री भाषेंत असण्याचा संभवसुध्दां नव्हता. माहाराष्ट्रिक लोक दक्षिणेंत बौध्दक्रांतिकालीं जेव्हां उतरले तेव्हां त्यांचें वाङःमय लौकिक स्त्रीपुरूषप्रणयविषयक लावण्यांच्या स्वरूपाचें असून, तें अद्याप अक्षरनिविष्टहि झालें नव्हतें, फक्त माहाराष्ट्रिक जनतेच्या तोंडी होतें.

**उत्तर हिंदुस्थानच्या उच्चतर आर्यांचें आधिपत्य**

उत्तरहिंदुस्थांनातील तत्कालीन उच्च क्षत्रियांहून व उच्च क्षत्रियांहून व उच्च अशोकादि राज्यकर्या वृषलांहून सुधारणेच्या बऱ्याच खालच्या पाह्यरीवर असलेल्या ह्या माहाराष्ट्रिक गणांची बौध्दक्रांतिकालीं अशी हीं सामाजिक, राजकीय व भाषिक हालहवाल होती. दक्षिणेंत वसाहती करून राहिल्यावर ह्यांच्या सामाजिक, राजकीय व भाषिक स्थितींत काय फेरबदल झाले त्याचें आतां वर्णन करावयाचें. पैकीं राजकीय स्थिति प्रथम घेऊं. आपापल्या गणापुर्ती लहानशीं गणराज्यें चालविण्याइतकीच ऐपत असल्यामुळें, ह्यांच्याहून वरिष्ठदर्जाच्या राज्यपध्दति ज्यांच्या आंगवळणीं पडल्या होत्या अश्या उत्तरेकडील व पूर्वेकडील जास्त सुधारलेल्या लोकांच्या अंमलखालीं ह्या लोकांना शकपूर्व 100 तासून शकोत्तर 1551 पर्यत म्हणजे सोळाशें वर्षे रखडावें लागलें.

शातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव इत्यादि उत्तरेकडील साहसी राज्यकर्त्यांनीं दक्षिणेंत जीं साम्राज्यें उभारिलीं ती परकीय व अल्पसंख्याक परंतु संस्कृतीनें वरचढ अशा लोकांनीं कमतरसंस्कृतीच्या माहाराष्ट्रिकांवर उभारलेली अधिराज्यें होतीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे. ह्या

परकीय अल्पसंख्यांक राज्यकर्त्यांचे गुण उचलण्याची ऐपत किंवा बुध्दि माहाराष्ट्रिकांच्या ठाई अत्यल्प होती, किंबहुना मुळींच नव्हती म्हटली असतां चालेल. शातवाहनांचें विहार, चालुक्यांचीं व यादवांचीं सुंदर देवालयें व राष्ट्रकूटांचीं लेणीं ह्या परकीय राज्यकर्त्यांच्या राशियतींतील स्थापत्यकलाविषयक प्रावीण्याची साक्ष देतात. फर्दापूर व दौलताबाद येथील मूर्तिकर्म व चित्रकर्म ह्या राज्यकर्त्यांच्या वेळच्या अदभुत कारागिरीचीं मूर्तिमंत स्मारकें आहेत.

पण, ह्या परकीय स्थापत्यकलेचा, मूर्तिकर्माचा किंवा चित्रकलेचा गंधहि माहाराष्ट्रिकांना कधीं शिवलेला दिसत नाहीं. हे परकीय राज्यकर्ते अस्तगंत झाल्याबरोबर त्यांच्या कलाहि त्यांच्याबरोबर अस्तास गेल्या. ह्या कला जर महाराष्ट्रांतील महरट्ट लोकांच्या असत्या, तर चालुक्यराष्ट्रकूटादि राज्यकर्ते गेल्याबरोबर देशांतून त्या समूळ नाहींश्या झाल्या नसत्या. पुढें मराठ्यांच्या अमलांत त्या पुनः उदयास आल्या असत्या म्हणावें तर दोन अडीचशें वर्षाच्या मराठ्यांच्या अमदानींत एकहि देऊळ किंवा एकहि मूर्ती किंवा एकहि चित्र असें दाखवितां यावयाचें नाहीं कीं जें चालुक्यादींच्या देवालयाशीं किंवा मूर्तीशीं किंवा चित्राशीं दूरचीहि बरोबरी करील. ह्या साऱ्या रडगाण्याचा अर्थ असां कीं, महाराष्ट्रिक लोक बऱ्याच कनिष्ठ संस्कृतीचे लोक होते. साम्राज्यें चालविण्याची कला जशी त्यांच्या आटोक्याच्या बाहेरची होती तश्याच इतरहि उच्च कला त्यांच्या होऱ्यांत येण्यासारख्या नव्हत्या.

**प्राचीन महाराष्ट्रिकांचें भाषा व वाङःमय मागासलेलें**

भाषेच्या व वाङःमयाच्याहि प्रांतांत माहाराष्ट्रिक लोक असेच मागासलेले होते. शाकवाहनांच्या कारकीर्दीत राज्यकर्ते प्राकृत भाषा बोलणारे पडल्यामुळें, महाराष्ट्री भाषेला किंचित उत्तेजन मिळालें. त्या उत्तेजनाचें फल एवढेंच झालें कीं शें-दोनशें महाराष्ट्री कवि किंचित गुणगुण करूं लागले. गाथासप्तशतींत बऱ्याच महाराष्ट्री कवींच्या कृतींमधील उतारे हाल शातवाहनानें दिले आहेत. ह्या काव्यप्रांताखेरीज शास्त्र, व्याकरण, मीमांसा, गणित, ज्योतिष, स्थापत्य, इतिहास इत्यादि गहन विषयावर महाराष्ट्रींत एक ओळहि लिहिली गेली नाहीं. रावणवही, गौडवहो, कर्पूरमंजरी, हीं हलक्या वाङःमयावरील पांच चार मोठीं म्हणावयाचीं पुस्तकें काय तीं महाराष्ट्री भाषेंतील ग्रंथसंपत्ति होय, आणि हेहि पांच चार ग्रंथ महाराष्ट्री भाषा मृत्युपंथास लागल्या काळचे आहेत, महाराष्ट्रीच्या ऐन तारूण्यांतील नव्हत. जैन-महाराष्ट्रीहि निराळीच बोली असल्यामुळें,

तींतील धर्मादिविषयक ग्रंथ प्रस्तुतप्रकरणीं जमेस धरण्यासारखे नाहींत. संस्कृत नाटकांत उच्च स्त्रियांच्या तोंडी जीं पद्यें कवींनीं घातलेलीं आढळतात तीं एवढेंच दाखवितात कीं महाराष्ट्री भाषेंत सुंदर पद्यरचना बरीच कमाविली गेली होती. उच्च स्त्रियांच्या तोंडीं महाराष्ट्री पद्यें घालीत ह्याचें कारण असें होतें कीं, हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व राजे माहाराष्ट्रिक स्त्रियांशीं विवाह करण्यांत भूषण मानीत, अश्या करितां कीं ह्या माहाराष्ट्रिक ऊर्फ माहाराजिक लोकांचा वंश त्या कालीं अत्यंत शुध्द गणिला जाई. असा हा माहाराष्ट्रिकांच्या भाषेचा एकंदर पल्ला होता. वाङःमयवैपुल्याच्या दृष्टीनें किंवा भारदस्तपणाच्या दृष्टीनें हा पल्ला अत्यन्त क्षुद्र होता. पण तोहि थोडक्याच अवधींत संपुष्टांत आला. शक पांचशेंच्या सुमारास महाराष्ट्री भाषेला उतरती कळा लागली. शक पांचशें पर्यंत शिलालेख, ताम्रपट, काव्यग्रंथ, वगैरे लिखाण प्राकृत भाषेंत होत असे, तें चालुक्यांच्या अमदानीपासून बंद पडून संस्कृत भाषेंत होऊं लागलें.

व्रात्यांच्या व पतितांच्या व पाखंडांच्या बौध्दक्रांतीला व त्यांच्या प्राकृत भाषांना आळा घालतां घालतां, वैदिक धर्माचें व संस्कृत भाषेचें पुनरूज्जीवन ब्राहमणांना व त्रैवर्णिकांना शक चारशें पाचशेंच्या सुमारास शक्य झालें. संस्कृतसिंह आखाड्यांत उतरल्याबरोबर प्राकृतमर्कटांनीं भयानें बहुतेक प्राणत्याग केला.

**महाराष्ट्रिकांत नागलोकांचें व त्यांच्या भाषेचें मिश्रण**

महाराष्ट्री भाषा सरकारदरबारांतून मागे पडावयाला वैदिक धर्माचें पुनरूज्जीवन हें तर एक कारण झालेंच. परंतु ह्याहूनहि जबरदस्त कारण कित्येक शतकें महाराष्ट्री भाषेला समाधी देण्याचें काम संथपणें करीत होतें. तें कारण सामाजिक होतें. माहाराष्ट्रिक लोक ज्या कालीं दक्षिणाराण्यांत वसाहती करण्यास उतरले त्या कालीं त्यांना ह्या प्रदेशांत त्यांच्याहूनहि संस्कृतीनें कनिष्ठ असे दुसरे एक लोक भेटले. हे लोक म्हणजे ज्यांना नागलोक म्हणतात ते. जनमेजयानें जेव्हां सर्पसत्र म्हणजे नागांचा नायनाट आरंभिला तेव्हां हे लोक उत्तरेतून दक्षिणेंत आले. जनमेयाच्या वेळची जी जुनाट संस्कृत म्हणजे वैदिक भाषा तिचा अपभ्रंश हे नागलोक बोलत. ह्या नागलोकांची एकंदर संस्कृति माहाराष्ट्रिकांच्या संस्कृतीहूनहि खालच्या दर्जाची होती. ह्यांशीं शरीरसंबंधादि मिलाफ माहाराष्ट्रिकांचा होऊन आस्तेआस्ते माहाराष्ट्रिक व नाग ह्यांच्या मिश्रणापासून एक नवीन राष्ट्र उत्पन्न होत होतें. हें नवीन राष्ट्र म्हणजे ज्यांना मरहट्टे, म्हराटे, मऱ्हाटे, मराठे

म्हणतात ते. एक भाषा बदलून तिच्या स्थानीं तत्सदृश्य अशी दुसरी भाषा जेव्हां प्रचलित झालेली दिसते तेव्हां त्या भाषांतरप्रचलनाच्या बुडाशीं दोन राष्ट्रांचें किंवा लोकांचें सम्मेलन झालेलें नियमानें आढळतें. सामाजिक संमेलन ज्या मानानें दाट किंवा विरळ असेल त्या मानानें त्या दोन भाषांचें मिश्रण दाट किंवा विरळ होतें. एक समाज दुसऱ्या समाजाहून अतीच अती बलिष्ठ असला व हे दोन समाज शेजाराला आले व त्यांच्यांत विशेष संघट्टन झालें, तर कनिष्ठ समाजाची भाषा अजीबात मरून जाते व तो कनिष्ठ समाज बलिष्ठ समाजाची भाषा अपभ्रष्ट रूपानें सर्वस्वीं बोलं लागतो. त्रैवर्णिक व एतद्देशज शूद्र या दोन समाजांचें जेव्हा सम्मेलन झालें तेव्हां हा प्रकार घडून आला. शूद्रांची मूळभाषा सपशेल बुडून गेली. नागांचा व आर्यांचा जेव्हां उत्तर हिंदुस्थानांत जनमेयकालीं व तत्पूर्वी संगम झाला, तेव्हांहि हाच प्रकार घडला. नागांचीं मूळ भाषा अजीबात लोपून गेली व ते वैदिक भाषेचा अपभ्रष्ट उच्चार करून ती आर्यभाषा बोलूं लागले. माहाराष्ट्रिकांचा व नागांचा जेव्हां दक्षिणेंत संगम, सहवास व शरीरसंबंध झाला, तेव्हां नागांचा जुनाट वैदिक भाषापभ्रंश व माहाराष्ट्रिकांची महाराष्ट्री ह्या दोन अपभ्रष्ट आर्यभाषांचा मिलाफ होऊन दोन्हींच्या लकवा जींत दृष्टयुत्पत्तीस येतात ती मराठी भाषा जन्मास आली. मराठी भाषेंत महाराष्ट्रींत नाहींत परंतु वैदिक भाषेंत आहेत व संस्कृत भाषेंत नाहींत परंतु वैदिक भाषेंत आहेत असे प्रयोग व प्रत्यय व क्रियापदरूपें जीं दृष्टींस पडतात त्याचें कारण नागांची महाराष्ट्री भाषेहून जुनी अशी वैदिक भाषापभ्रंश भाषा होय.

**महाराष्ट्राची वसाहत**

महाराष्ट्रींत नाहींत परंतु वैदिक भाषेंत आहेत अश्या दोन लकबा उदाहरणार्थ येथें उतरतों. मराठींत करूनश्यानी, जेऊनश्यानी, घेऊनश्यानी, असें एक धातुसाधित अव्यय शूद्रांच्या व देशस्थांच्या बोलण्यांत येतें. हा श्यानी प्रत्यय आर्ष, मागधी, महाराष्ट्री, सौरसेनी, पैशाची, अपभ्रंश किंवा प्राकृतभाषा ऊर्फ पाअडभाषा ऊर्फ पाली भाषा अश्या कोणत्याच प्राकृत भाषेंत नाहीं. हा प्रत्यय पाणिनीय संस्कृत भाषेंतहि नाहीं, हा फक्त वैदिक भाषेंत आहे व तोहि अत्यंत तुरळक आहे. वैदिकभाषेंत सन ला इ प्रत्यय लागून सनि असें सप्तम्यन्त रूप धातूंना जोडून कांहीं थोडीं धातुसाधित अव्ययें बनतात; जसें, गृणीषणि, तरीषणि, नेषणि इ. इ. इ. ह्या सनि-षणि प्रत्ययापासून मराठी श्यानि प्रत्यय आला आहे. आतां श्यानि प्रत्यय मराठींत महाराष्ट्रींतून तर आला नाहीं, कारण महाराष्ट्रींत असा प्रत्ययच मुदलांत नाहीं. तेव्हां मराठींत तो आला कोणत्या

द्वारानें? मराठीचा व वैदिक भाषेचा निकट सहवास तर कालांतरामुळें कधींच शक्य नव्हता. तेव्हां एकच तोड राहिली. हा प्रत्यय नागलोकांच्या वैदिक अपभ्रंशांतून मराठींत आला. दुसरें उदाहरण झडकरि, चटकरि इत्यादि धातुसाधित अव्ययांचें. करि हें धातुसाधित अव्यय कोणत्याच प्राकृतांत नाहीं. फक्त वैदिक भाषेंत इ प्रत्यय धातूंना लागून दृशि, बुधि, संचक्षि अशीं धातुसाधितें आढळतात. कर धातूला इ प्रत्यय लागून झालेलें हें करि धातुसाधित नागांच्या वैदिक अपभ्रंशाद्वाराच तेवढें मराठींत येण्याचा संभव आहे. तात्पर्य, माहाराष्ट्रिकांचा व नागांचा मिलाफ शकोत्तर पांचशेंच्या सुमारास परिपूर्ण होऊन, केवळ महाराष्ट्री भाषा बोलणारे लोक महाराष्ट्रांत राहिले नाहींत. माहाराष्ट्रिक नागोत्पन्न अशी सर्व प्रजा मराठी अपभ्रंश बोलूं लागली. महाराष्ट्री भाषेला असा हा मृत्यु नागांच्या संमेलनानें आला.

महाराष्ट्री भाषा बोलणारेच कोणी न राहिल्यामुळें, त्या भाषेचा उपयोग शकोत्तर चार-पांचशेंच्या सुमारास चालुक्यादि परकीय संस्कृत भाषा समजणाऱ्या राजकर्त्यांनीं सार्वजनिक शिलालेखांत व ताम्रपटांत वगैरेंत सहजच केला नाहीं. मराठींत ताम्रपटें व शिलालेख कोरावे तर त्या नव्या भाषेला अद्याप शिष्टमान्यता आली नव्हती. तेव्हां चालुक्यादींच्या सार्वजनिक लेखांत संस्कृतभाषेचा उपयोग करण्याशिवाय गत्यंतर राहिलें नाहीं. नाटकांतून वगैरे ग्रंथांतून महाराष्ट्रीचा उपयोग कवि करीत, परंतु तो उपयोग केवळ परंपरागत रूढि म्हणून करीत, महाराष्ट्री भाषा जिवंत होती म्हणजे ती भाषा बोलणारे कोणी लोक शकोत्तर पांचशें नंतर राहिले होते म्हणून करीत नसत.

येणें प्रमाणें शक पांचशेंच्या सुमारास मराठे म्हणून ज्यांना म्हणतात ते लोक महाराष्ट्रिक व नाग यांच्या हजारपांचशें वर्षाच्या संगमापासून महाराष्ट्रांत निजपले. ह्या मराठ्यांची संस्कृति, अर्थात, महाराष्ट्रिक व नाग ह्यांच्या संस्कृतींहून निराळी नव्हती, दोहोंच्या संस्कृतीचें मिश्रण होती. ह्या मिश्रणांत नागांचें प्रमाण किती व महाराष्ट्रीकांचें प्रमाण किती, तेंहि अजमाविण्यास साधने6 आहेत. महाराष्ट्री पुत्त व मराठी पूत (तोंडी) ह्या शब्दांचीं विभक्तिरूपें देतों व त्यांत माहाराष्ट्रिकांच्या महाराष्ट्रीचा अंश किती व नागांच्या वैदिक अपभ्रंशाचा भाग किती त्याचा निर्णय करतों. ह्या निर्णयावरून मराठी संस्कृतींत महाराष्ट्री व नाग ह्या दोन संस्कृती कोणत्या प्रमाणांत मिश्र झाल्या त्याचा स्थूल अंदाज करतां येईल.

| | महाराष्ट्री | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| | | (1) | |
| | पुत्त | पुत्त | पूत (तोंडी) |
| 1 | पुत्तो | पुत्तु | पूतु (प्राचीन), पूत (अर्वाचीन तोंडी) |
| 2 | पुत्तं | पुत्तु | पूतु (प्रा.) पूत (अर्वा. तोंडी) |
| 3 | पुत्तेण | पुत्तिण, | पुतेँ (लेखी), पूतानें, पूतेँ, पूतानेँ (तोंडी) |
| 4 | पुत्ताअ | पुत्ताअ | पूता |
| 5 | पुत्तत्तो | | |
| | पुत्ताहिंतो | | पूतातून |
| | पुत्ताउ | पुत्तहु | पूनाहून |
| | पुत्ताहि | | |
| 6 | पुत्तस्स | पुत्तह | पूता |
| 7 | पुत्तम्मि | पुत्ति | पूतीँ |
| | पुत्ते | पुत्तहिँ | पूताँत |
| 8 | पुत्त | | पूत (तोंडी) |
| | पुत्ता | | पूता |
| | | (2) | |
| 1 | पुत्ता | पुत्ता, पुत्त | पूत (तोंडी) |
| 2 | पुत्ता | पुत्ता,पुत्त | पूत (तोंडी) |
| 3 | पुत्तेहिँ | पुत्तेहिँ | पूतांहीं |
| | | पुत्तेहिँ | पूतांनीं |
| | | | पूतीँ |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | - | - | पूताँ |
| 5 | पूत्ताउ | | पूताँहून |
| | पुत्तत्तो | पुत्तहूँ | पूतांतून |
| 6 | पुत्ताणँ | पुत्ताहँ | पूताँ |
| 7 | पुत्तेसु | पुत्तहिँ | पूतीँ |
| 8 | पुत्ता | पुत्तहो | पूतानों, पूतहो (तोंडी) |

महाराष्ट्री पुत्त शब्द मराठींत पुत होतो म्हणजे त्त या संयोगाचा त असा अंसयोग होतो व संयोगाच्या पूर्वील स्वर ऱ्हस्वाचा दीर्घ होतो. जें माहाराष्ट्रिक त्त असा पूर्वी उच्चार करीत ते स्वतःच त असा नंतर उच्चार करूं लागले, असें म्हणून भागणार नाहीं. त्त चा त उच्चार होण्याला कांहीं तरी बहिःकारण पाहिजे. हें बहिःकारण नागलोक होत. नागांना (1) जोडाश्ररें उच्चारण्याचा कंटाळा असे. तसेंच (2) अन्त्य अ उच्चारण्याचाहि कंटाळा असे. (3) संयोगापूर्वील स्वर दीर्घ उच्चारण्याचीहि त्यांना खोड असे. माहाराष्ट्रिकांवर लादल्या गेल्या आणि त्या खोडी नागामाहाराष्ट्रिकोत्पन्न जे मराठे त्यांच्या भाषेंत दिसूं लागल्या. माहाराष्ट्रिकांचे फक्त प, उ आणि त हे तीन उच्चार तेवढे राहिले. महाराष्ट्री पुत्तोतील (4) अन्त्य ओ चा नागांनीं उ करून पूतु असें रूप बनविलें. ओ उच्चाराहून उ उच्चार नागांना सोपा वाटे. महाराष्ट्री पुत्तेणचें अन्त्य अ गाळून व (5) न चा अनुनासिक करून नागांनीं पूतें असें उच्चारण केलें. माहाराष्ट्रिकांना स्वरापुढें स्वर संधि न करतां उच्चारण्याची खोड फार. (6) ती खोड नागांनीं मोडून टाकन पुत्ताअचें पूता बनविलें. महाराष्ट्री पुत्तत्तोतील ओचा उ करून, जोडाक्षरांचीं साधीं अक्षरें करून व (7) अनुनासिक लटकावून पूतातून असें पंचमीचें रूप बनविलें. पुत्ताउतील (8) उचा हु, हुचा हूँ व हूँचा हून बनवून पूताहून हें रूप रचिलें. पुत्तस्स मधील (9) स चा ह व हचा अ करून पूता असें रूप निर्मिलें. हे नऊ फेरफार फारसे चमत्कारिक नाहींत. सर्वात अत्यन्त चमत्कारिक फेरफार म्हटला म्हणजे (10) पूताँ, पूताँहीँ, पूताँनीँ, पूताँहून, पूताँतून, पूतानों, ह्या अनेकवचनीं रूपांतील ता वरील अनुनासिकाचा होय. मराठींत पूता हें चतुर्थीचें एकवचन आहे व पूताँ हें चतुर्थीचें अनेकवचन आहे. तसेंच संबोधनाचें एकवचन पूता आहे व अनेकवचन पूतानों आहे. पूतानोँ हा पूतानहो ह्या रूपाचा अपभ्रंश आहे.

येथें असा प्रश्न येतो कीं, पूताँ व पूतानहो या अनेकवचनीं रूपांत अनुनासिक व नकार कोठून आला? हाच प्रश्न थोडा विस्तृत करून असा प्रश्न येतो कीं मराठींत पुत्रांस, पुत्रांना, पुत्रांतें, पुत्रांहून इत्यादि रूपांत अनेकवचनीं अनुस्वार व अनुनासिक कोठून येतात? महाराष्ट्रींत पर हे अनुनासिक - अनुस्वार नाहींत. प्रश्नाला उत्तर असें आहे कीं हे अनुनासिक - अनुस्वार मराठींत नागभीषेंतून आले. पूर्ववैदिकभाषेंत पुत्र ह्या शब्दाचें प्रथमचें अनेकवचन (1) पुत्रासः, (2) पुत्राः, (3) पुत्रे व (4) पुत्रान असें चार प्रकारांनीं होत असे. 'संस्कृत भाषेंचा उलगडा' ह्या निबंधांत हा चतुर्विध प्रकार मीं दाखवून दिला आहे. वेदांत पुत्रान ह्या सांच्याचें म्हणजे अन प्रत्ययांत रूप अनेकवचनी प्रथमेचें क्वचितच येतें. अन प्रत्यायांत रूप द्वितीयेच्या अनेकवचनाचें असतें हें सर्वाच्या नित्यपरिचयाचें आहे. परंतु वेदांत क्वचित हें अनप्रत्ययांत रूप प्रथमेच्या अनेकवचनी योजिलेलें पाहून, सायणाचार्यांनीं छंदिस बहुलं या घबाड नियमाचा आश्रय करून, हें अनप्रत्ययांत रूप प्रथमेच्या अनेकवचनाचें आहे असें विधान स्वच्छ केलें आहे. आणि असें विधान केल्यावांचून दुसरी गति नव्हती. सायणाच्या ह्या साहसी विधनाबद्दल तुच्छतादर्शक आश्चर्य दर्शविण्याचें कारण नाहीं. पूर्ववैदिक भाषेंत व वैदिक भाषेंतहि प्रथमेचें अनेकवचन अनप्रत्यय लागून होत असे हें मला नुकतेंच अलीकडे दोन वर्षाखालीं कळून आलें आहे. पुत्रान हें प्रथमेचें अनेकवचन ज्या एका पूर्ववैदिक भाषेंत होतें त्या पूर्ववैदिक भाषा बोलणाऱ्या ऋषिलोकांचा व नागाचा मिलाफ होऊन नागांनीं हें अनप्रत्ययांत रूप उचललें. ह्या पूर्ववैदिक पुत्रान रूपाचा अपभ्रंश नागभाषेंत पुत्तां, पुताँ असा होऊन त्या नागभाषेच्या द्वारा मराठींत पूतां, पूताँ अशा रूपानें तो प्रविष्ट झाला. पूतांस, पूतानों, इत्यादि मराठी अनेकवचनी रूपांत अनुस्वार-अनुनासिक कोठून आले त्याचा हा असा हिशेब आहे. त्यांना व त्यानला, त्याँतून व त्यानतून, त्यांचे व त्यानचे, अशीं अनुनासिक-अनुस्वार-नकारयुक्त रूपें येतात, त्याचें कारण वैदिक भाषेंतून नागलोकांनी उचललें हें प्रथमेचें अनेकवचनी अनप्रत्ययांत रूप होय. पूतानहो - पूतानों या मराठी रूपांत तर हें अन प्रत्ययान्त रूप स्पष्ट दिसतें. महाराष्ट्रींत संबोधनाच्या अनेकवचनीं अनप्रत्ययान्त किंवा अनुस्वार-अनुनासिकयुक्त रूप नाहीं.

वर दिलेल्या सोळा मराठी विभक्तिरूपांत असेच आणिक निदान दहा बारा नागभाषेंतील विशेष दाखवून देतां येतील. म्हणजे सोळा महाराष्ट्री रूपांत नागभाषेच्या संसर्गानें सुमारें वीस पंचवीस फेरफार झाले, अशी फलनिष्पत्ति होत्ये. सबंद महाराष्ट्री भाषा सबंध मराठी भाषेशीं जर

तोलली तर नागभाषेचा संस्कार महाराष्ट्री भाषेवर एकास दीड ह्या प्रमाणावर झालेला आढळावा असा स्थूल अंदाज आहे. ह्या नैरूक्तिक विधानाचा समाजदृष्ट्या असा अर्थ होतो कीं महाराष्ट्रिक लोकांत नागलोकांचें मिश्रण एकास दीड ह्या प्रमाणांत होऊन मराठे लोक ज्यांस म्हणतात ते निर्माण झाले. माहाराष्ट्रिकांची संस्कृति नागलोकांच्या संस्कृतींहून किंचित श्रेष्ठ असल्यामुळें, नागामाहाराष्ट्रिकोत्पन्न नव्या लोकांना मराठे हें नांव माहाराष्ट्रिक ह्या नांवावरून प्रचलित झालें, नागलोकांच्या नांवावरून नागें असें नांव प्रचलित झालें नाहीं.

नागास्त्रियांशीं आस्तिकादि ऋषींचे व अर्जुनादि क्षत्रियांचें शरीरसंबंध होऊन पितृसावर्ण्यानें ब्राह्मण व क्षत्रियप्रजा झालेली महाभारतादि इतिहासांतून प्रसिध्द आहे. महाभारतांत व विष्णुपुराणादि पुराणेतिहासग्रंथांत कश्यपाच्या तेरा स्त्रियांपैकीं कद्रूच्या पोटीं नागांचीं उत्पत्ति सांगितली आहे. ह्या दंतकथेंत इतिहासभाग असा समजावयाचा कीं कश्यप समुद्राभोंवतातील म्हणजे अर्वाचीनकाळीं यूरोपियन लोक ज्याला क्यास्पियन समुद्र म्हणतात त्याच्या भोंवतातील प्रांतांतून राक्षस, गरूड, नाग, इत्यादि लोक अत्यंत प्राचीनकालीं रहात असत. तेथून परिभ्रमण करीत करीत नागलोक काश्मीर, तक्षशिला, सिंधु, मथुरा, इत्यादि प्रदेशांतून पाताळांत म्हणजे नर्मदेच्या दक्षिणेंस उतरले. दक्षिणेंत वसाहती करून त्यांनीं अनेक गांवें वसविलीं व क्षुद्र राज्यपध्दति निर्माण केल्या, नागलोकांचीं शंभर कुळें होतीं. पैकीं जनमेजयानें वासुकी, तक्षक, ऐरावत इत्यादिकांचीं अनेक कुळें मारिलीं. ह्या नागलोकांत स्त्रियांचें प्राबल्य प्रधान असे. अर्वाचीन नायर लोक नागांचें वंशज होत. नाग शब्दाला संबंधार्थक प्राकृत केर प्रत्यय लागून नागकेर हा प्राकृत शब्द झाला. ह्या नागकेर शब्दाचा अपभ्रंश नाअएर, नाएर, नायर.

यलबुर्ग्याचे सिंद (शक 900-1100) नागवंशीय होते व ह्यांच्या ध्वजेवर नागांचें चित्र असे. सध्यां ग्वालेरच्या शिंद्यांच्या मुद्रेवरहि दोन नागांच्या प्रतिमा असतात. शिंदा हा शब्द शक 900 तील सिंदः ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. सेंद्रकः शब्दापासून सिंदा शब्द झाला अशी कित्येकांची समजूत आहे, परंतु ती साधार नाहीं. सेंद्रक शब्दांपासून शेंद्रे हें मराठा आडनांव होतें. तात्पर्य, हे नागलोक माहाराष्ट्रिक लोकांच्या फार पूर्वी नर्मदेपासून त्रावणकोरपर्यंतच्या मुलखांत पसाले होते.

माहाराष्ट्रिकांचा व नागांचा मिलाफ शकपूर्व 400 पर्यंत एक हजार वर्षे होऊन, त्या दोघांच्या मिश्रणानें मराठे म्हणून ज्यांस म्हणतात. त्या लोकांची उत्पत्ति झाली. दोन्हीं लोक

गणराज्यांसारख्या क्षुद्रराज्यपध्दति चालविणारे असून त्यांना त्याहून वरिष्ठ राज्यपध्दति चालविण्याची ऐपत व अर्थात अक्कल आलेली नव्हती. तेव्हां उत्तरेकडील चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, वगैरे सम्राटांची पाइकी करण्यांत ह्यांचे क्षात्रतेज खर्ची पडे तें यथायोग्य होतें. माहाराष्ट्रकांच्या महाराष्ट्रभाषेंत कांहीं काव्यवाड्मय तरी असे. नागांच्या नागभाषेंत जें काय वाड्मय असे तें सर्व तोंडी असून त्याला अक्षरसंनिवेश कधींच मिळाला नाहीं. अशा ह्या निरक्षर नागांचे व ईषदक्षर माहाराष्ट्रिकांचे प्रज जे मराठे त्यांच्यांत ह्या दोन्ही वंशांतील दोष व गुण उतरून त्यांचीं संस्कृति माहाराष्ट्रिकांहून कमतर व नागांहून किंचित उच्चतर अशी निजपली. माहाराष्ट्रिक हे वंशानें सूर्यवंशी क्षत्रिय होते आणि नाग हे शेषवंशी क्षत्रिय होते. ह्या दोन वंशांचा मिलाफ होऊन जे मराठे लोक शक चारशेंच्या सुमारास निजपले त्यांच्यांत सहजच सूर्यवंश व शेषवंश असे असे दोन वंश दिसूं लागले. देवधर्माच्या बाबतींत माहाराष्ट्रिक पुराण वैदिक धर्माचे व बौध्दक्रांतिकालानन्तर उदभवलेल्या रामकृष्णादींच्या उपासनामार्गाचे अनुयायी होते.

**नागालोकांवरील प्रभाव**

नागलोक फार पुरातनकालापासून सर्पपूजक व वनदेवताभजक असून, बौध्दक्रांतिकालानंतर बौध्दधर्माचाहि पगडा त्यांच्यावर बसला. बौध्द भिक्षु व श्रमणक दक्षिणेंत सर्वत्र पसरून जेथें जेथें नागांची वसति होती तेथें तेथें त्यांनीं आपले विहार व धागोबा स्थापिले. दक्षिणारण्यांतील नागांच्या वसतीची कोणतीहि डोंगरी किंवा मैदानी तर्फ घ्या, तेथें तेथें बौध्दांच्या विहार व धागोबा यांच्या खुना मुबलक सांपडतात. उदाहरणार्थ पुण्यापासून खंडाळ्यापर्यतच्या तीस मैलांच्या डोंगरी तर्फेत (1) पर्वती, (2) भांबुर्डे, (3) घोरवडी, (4) इंदुरी, (5) फिरंगाइचा डोंगर, (6) भाजे, (7) बेडसें, (8) कालें ह्या आठ स्थलीं बौध्दांच्या धर्माचे अवशेष आढळतात. पुण्यापासून पळसदेवापर्यतच्या मैदानी टापूंतहि बौध्द अवशेष असेच विपुल आहेत. तात्पर्य बौध्दांची छाप नागलोकांवर त्याकालीं अतिशय बसली.

**प्राचीन मराठयांतील राजकीय निष्ठेच्या अभावाचें कारण**

नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठ्यांच्यावर, अर्थात, वैदिक धर्माची, उपासनामार्गाची, वनदेवतापूजेची, सर्पोपासनेची व बौध्दधर्माची अशी पंचविध छाप बसून, त्यांच्या मनोभूमिकेचा देवधार्मिक भाग एकनिष्ठ न राहतां चित्रविचित्र रंगविला गेला. त्यामुळें अमूक देवधर्माचे मराठे

कट्टे विश्वसनीय अनुयायी आहेत असें म्हणण्याची सोय राहिली नाहीं. सगळ्याच देवधर्माचे जे अनुयायी ते कोणत्याच देवधर्माचे कट्टे भक्त राहणें शक्य नव्हते. अशी ह्या मराठा क्षत्रियांची देवधार्मिक स्थिति शक चारशें पांचशेच्या पुढील तीन चार शतकांच्या अवधींत होती. त्यांना धड आर्य ऐतिह्याहि माहीत नव्हतें, धड बौध्द ऐतिह्याहि अवगत नव्हतें, आणि नागांच्या वन्यदेवधर्मात मुळीं ऐतिह्याहि नव्हतें. त्यामुळें मराठे म्हणजे महाराष्ट्रांत त्या कालीं एक अडमुठ्यांचा अव्यवस्थित जमाव होऊन बसला होता. निश्चित देव नाहीं, निश्चित धर्म नाहीं, अक्षर नाहीं, ऐतिह्य नाहीं, असे हे लोक राज्यकर्त्यांच्या व देवब्राह्मणांच्या अखंड पराभवाला कारण होऊन गेले. जो खावयाला देईल त्याच्या बाजूनें लढावयाचें, एवढा एकच ह्यांचा धंदा राहिला. आज चालुक्याच्या बाजूनें लढले, उद्यां राष्ट्रकूटांच्या तैनातींत शिरून चालुक्यांना पाडिलें, पर्वा यादवांची पाइकी स्वीकारून उच्चाटन केलें, असा हा मराठा क्षत्रियवर्ग अजाणतेपणें देशांत राजकीय अस्वस्थेला कारण झाला होता. पोटाला घालण्याला जेव्हां कोणी धनी मिळत नसे तेव्हां रिकामपणाच्या अवधींत हे दंगेखोर लोक एकमेकांशीं लढून प्रतिपक्ष्याची दहा पांच मैल जमीन सर करण्यांत गुंतलेले असत. असल्या अंतस्थ कलहाच्या हकीकती कांहीं मी छापिल्या आहेत व कांहीं मजजवळ अद्याप अप्रकाशित राहिल्या आहेत. हे नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न लोक म्हणजेच शहाजीकालीन अराष्ट्रीय ऊर्फ अधम संस्कृतीचे मराठे लोक होत.

**मराठ्यांचा उध्दार करणारी उच्च उत्तरीय आर्यांची संस्कृति**

शहाजीकालीन मराठे म्हणजे कोण लोक होते व हे लोक इतके पराकाष्ठेचे अराष्ट्रीय व अधम कसे बनले ह्या प्रश्नाचा उलगडा करण्याच्या खटाटोपाप्रीत्यर्थ 63 व्या कलमापासून 99 व्या कलमापर्यंतचें 36 रकाने तपशील द्यावा लागला. हे मराठे लोक क्षत्रिय खरे, परंतु रामकृष्णजनकादि आत्मानात्मविचार करणाऱ्या व साम्राज्यें चालविणाऱ्या थोर क्षत्रियांचें हे साक्षात वंशज नव्हत, रामकृष्णादिकांच्या काळच्या कांहीं कमसुधारलेल्या आयुधजीवी क्षत्रियांचे व नागांचे हे मुख्यत्वेंकरून वंशज होत. ह्यांच्याखेरीज दुसरे एक लोक आपणास मराठा क्षत्रिय म्हणून म्हणविणारे शहाजीकालीं होते. परंतु तत्संबंधक मराठा क्षत्रिय ह्या शब्दाचा अर्थ महाराष्ट्रप्रदेशांत कांहीं शतके राहिलेले उत्तर हिंदुस्थानांतील क्षत्रिय असा होता, नाग महाराष्ट्रिकोत्पन्न मऱ्हाटा असा नव्हता. ह्या महाराष्ट्रदेशनिवासी मराठा क्षत्रियांत चालुक्य, यादव, पल्लव, भोज इत्यादि थोर राजघरण्यांतील क्षत्रियांच्या वंशजांचा समावेश होतो. चाळके, यादव, जाधव, पालवे, भोसले, हे

शब्द चालुक्य वगैरे संस्कृत शब्दांचे मराठी अपभ्रंश होत. ह्या थोर राजघराण्यांत पुलकेशिन, अमोघवर्ष, विक्रमादित्य, सिंघण, अपरार्क इत्यादि बडीं बडीं धेंडे होऊन गेलीं आणि ह्यांच्याच वंशांत शहाजी व शिवाजी हे अवातारी पुरूष निजप्ले. जसा महाराष्ट्र - ब्राह्मण ह्या शब्दाचा मराठा - ब्राह्मण हा मराठी अपभ्रंश आहे. तसाच महाराष्ट्र - क्षत्रिय ह्या शब्दाचा मराठी - क्षत्रिय हा मराठी अपभ्रंश आहे. महाराष्ट्र - ब्राह्मण म्हणजे महाराष्ट्रदेशांतील चिरनिवासी ब्राह्मण असा जसा अर्थ केला जातो, तसाच अर्थ महाराष्ट्र - क्षत्रिय म्हणजे महाराष्ट्र देशांतील चिरनिवासी क्षत्रिय असा अर्थ केला जात असे.

हे भोज, यादव, चालुक्य, राष्ट्रकूट, निकुंभ इत्यादि क्षत्रिय संस्कृतादि भाषा जाणणारे असून वैदिक संस्कृतीचे मोठे पुरस्कर्ते असत. ह्यांच्याच आश्रयानें विज्ञानेश्वर, भास्कराचार्य, हेमाद्रि वगैरे नामांकित पंडितांनीं संस्कृतसरस्वतीची अपूर्व सेवा केली. नागमहाराष्ट्रिकोत्पन्न मराठ्यांच्या आश्रयानें भास्कराचार्यादि प्रतिभासंपन्न शोधकांचा निर्वाह झाला नाहीं, व झाला नसता. कारण हे पंडित काय करतात व ह्यांच्या कर्तबगारीचा उपयोग काय, हेंच मुळीं समजण्याची अक्कल नागमहाराष्ट्रिकोत्पन्न मराठ्यांत नव्हती. भोजचालुक्यादि महाराष्ट्र - क्षत्रिय व नागमहाराष्ट्रिकोत्पन्न मराठे ह्यांच्या संस्कृतींत हा असा जमीनअस्मानाचा फरक होता. आणि असा फरक पडल्यामुळें भोजचालुक्यादि महाराष्ट्र - क्षत्रिय नागमाहाराष्ट्रिकादि मराठ्यांशीं विवाहादि शरीरसंबंध करण्यात कमपक्ष मानीत. हा भेद महाराष्ट्रांत भोसल्यांच्या राजवटींतहि प्रचारांत होता. भोसल्यांचा शरीरसंबंध विवक्षित पंचकुळींत व दसकुळींत होत असे, हव्या त्या मराठा कुळींशी होत नसे. कारण भोसले हे माहाराष्ट्र - क्षत्रिय असल्यामुळें नागमहाराष्ट्रिकोत्पन्न मराठ्यांशीं संबंध करण्यांत त्यांना कमीपणा वाटे. ह्या रूढींचा एक चमत्कारिक व हास्यकारक परिणाम होई. भोसले हे पंचकुळीच्या बाहेरील मराठ्यांना परमार्थानें संस्कृतिदृष्ट्या कमतर समजत, तर उलट बाहेरील मराठे लोक भोसले व त्यांची दसकुळी व पंचकुळी ह्यांना रागानें कमअस्सल म्हणून नांवें ठेवीत! महाराष्ट्र - क्षत्रिय व नागमहाराष्ट्रिकोत्पन्न मराठे हे दोघेहि क्षत्रियच. फक्त संस्कृतींत तेवढा जमीनअस्मानाचा फरक, एका पक्षाची साम्राज्यें चालविण्याची योग्यता तर दुसऱ्याची सामान्य देशमुखीहि टिकविण्याची अयोग्यता. एक चतुरस्र विद्येचा भोक्ता; दुसरा विद्येचा पिढीजात शत्रु. एक सनातनधर्माचा व गोब्राह्मणांचा कैवारी; दुसरा भेटेल त्या देवधर्माचा व साळूमाळूचा अनुयायी. एक सुवर्णयज्ञोपवीत धारण करण्यांत भूषण मानणारा, तर दुसरा नागनरसोबा डोक्यावर घेऊन नाचनारा. असल्या ह्या कनिष्ठ दर्ज्याच्या क्षत्रियाची व्यवस्था

कशी लावावी, त्याला सनातन धर्माकडे कसा वळवावा व तो वाटेल त्याची पाइकी न करील अशी व्यवस्था कशी करता येईल, ही अडचण राष्ट्रकूट, यादव, वगैरे राज्यकर्त्यांना त्या त्या कालीं सहजच पडे. सदरील विवंचनेचें परिमार्जन त्या कालीं कसें व कितपत करतां आलें ह्या बाबीची स्फुटता पुढें करतों.

चालुक्यादींच्या राजवटींत नागमहाराष्ट्रिकोत्पन्न मराठ्यांची व्याप्ति महाराष्ट्रदेशांत सामान्य शेतकऱ्यांपासून तों पाटील - देशमुखांपर्यत झालेली होती. प्रथम जेव्हां माहाराष्ट्रिक दंडकारण्यांत व दक्षिणेंत वसाहती करूं लागले तेव्हां तर्फे तर्फेनें त्यांनीं गणराज्यें स्थापिलीं. गणराज्यांतील मुख्य जो जेष्ठराज त्यांच्याकडे गणाचें पुढारपण असें व गणसंघांतील गण त्याचे अनुयायी असत. चालुक्यादि सम्राटांच्या अमदानींत जेष्ठराज देशमुख बनले व गणांतील गण पाटील व कुणबी बनले, आणि गणराज्यसंस्था लुप्त झाली. पाटील म्हणजे पट्टकील. पट्टकील ह्या सामासिक शब्दाचा अर्थ त्यांतील अवयवशब्दांवरून स्पष्ट आहे. अशोकादींच्या वेळीं कपसाचें विणलेले पट्ट लिहिण्याकरितां वापरीत, जमिनीच्या मालकीची नोंद ह्या पट्टयांवर करीत आणि ते पट्ट कीलकांत म्हणजे वेळूच्या पोकळ कांडांत घालून सुरक्षित ठेवीत. पट्टकील म्हणजे पट्ट ज्यांत ठेविले आहेत तीं वेळूची पोकळ कांडें. हें पटकील ज्याच्या ताब्यांत असत त्या गांवच्या ग्रामणीला पट्टकीलक म्हणत. पट्टकीलक या शब्दाचा अपभंश पट्टकील. पट्टकील या शब्दाचा मराठी अपभ्रंश पाटैलु, पाटेल, पाटील. तांब्याच्या पत्र्यांवर जमिनीच्या मालकीची नोंद करण्याची कला निघाल्यावर पाटैलु जवळ ताम्रपत्रेंहि संग्रहार्थ रहात. चालुक्यादींच्या कारकीर्दीत गणसंघांतील कांहीं गण गांवगन्नाचे पाटैलु बनले आणि कांहीं गण कुणबी बनले.

कुणबी म्हणजे कुलपति. कुलपतीचा अपभ्रंश कुळवइ, कुळवी, कुणबी. कुणबी म्हणजे शूद्र नव्हे. कुणबी म्हणजे जमीन करणारा. तो निरपवादपणें चालुक्यांच्या चातुर्वर्णिक अमदानींत नागमहाराष्ट्रिकोत्पन्न मराठा असे, शूद्र निखालस नसे. शूद्रांचें काम फक्त सेवा करण्याचे. तात्पर्य, चालुक्यायादवांच्या राशियतींत जमीन करणारे कुणबी, कुणब्यांचे पुढारी पाटील व पाटलांचे पुढारी देशमुख एथून तेथून सर्व देशभर नागमहाराष्ट्रिकोत्पन्न मराठे असत. सध्यां कुणबी थोडासा गबर झाला म्हणजे तो आपल्याला मराठा कां म्हणवितो व सामान्य कुनब्याला पाटील या नांवानें संबोधिलें असतां तो खूष कां होतो त्याचें बीज असें आहे कीं, कुणबी हा वंशानें मराठा आहे व मराठा म्हणवून घेण्याचा त्याला जन्मसिध्द व वंशसिध्द हक्क आहे. ही कुणबी,

पाटील व देशमुख मराठामंडळी मराठी भाषा बोलणारी असून आर्य संस्कृतीच्या अगदीं खालच्या पाह्यरीवर होती व त्यांना आर्य संस्कृतीचा अभिमान जेणें करून येईल ते उपाय महाराष्ट्र - क्षत्रियांना व ब्राह्मणांना कर्तव्य होते.

त्याकालीं महाराष्ट्रांतील शूद्र, कुलपतीच्या म्हणजे कुणब्याच्या म्हणजे शेतकऱ्याच्या, प्रतिष्ठेप्रत चढला नव्हता. माहाराष्ट्रिकांची व नागांची दक्षिणेंत जेव्हां गांठ पडली तेव्हां नागलोकांत तीन वर्ण ऊर्फ जाति अस्तित्वांत होत्या, (1) नाग - क्षत्रिय, (2) नागशूद्र व (3) नाग अतिशूद्र. पैकीं नाग - क्षत्रियांशीं माहाराष्ट्रिकांचा शरीरसंबंध होऊन मराठे लोक निर्माण झाले. नाग - अतिशूद्र म्हणजे सध्यां ज्यांना आपण महार म्हणतों ते. ह्यांच्या नांवापुढें नाग = नाक हा प्रत्यय अद्यापहि असतो, जसें रामनाक, कामनाक, इ. इ. इ. नाग - शूद्र जे होते तेच मराठे लोक अस्तित्वांत आले त्या समयींचे ह्या देशांतील शूद्र होत. माहाराष्ट्रिक लोक दक्षिणेंत उतरले तेव्हां त्यांच्या बरोबर उत्तरेंतील शूद्रातिशूद्र सहजींच फार थोडे आले. आर्य वसाहतकार जेथें जेथें जात तेथें तेथें त्यांना जे भूमिज अर्धरानटी लोक भेटत त्यांना ते दास्यकर्म करावयास लावून शूद्र व अतिशूद्र बनवीत. दक्षिणेंत माहाराष्ट्रिकांना नाग - शूद्र व नाग - अतिशूद्र आयतेच नागलोकांत असलेले आढळले. ह्या नागशूद्रांत माहाराष्ट्रिकांच्या बरोबर आलेले उत्तरदेशीय अनिरवसित शूद्र, वैश्य व नाग-क्षत्रिय यांचे शरीरसंबंध होऊन शूद्र - कुणबी म्हणून ज्यांना म्हणतात ते शहाजीकालीन लोक निर्माण झाले. तेव्हां नवीन शूद्र बनविण्याची खटपट करावी लागली नाहीं. हे नागशूद्र व अतिशूद्र नाग-क्षत्रियांहूनहि नीचतर संस्कृतीचे असत, हे सांगणें नलगे. ह्यांच्यांतहि आर्य संस्कृतीचा अभिमान उत्पन्न करणें महाराष्ट्र - क्षत्रिय व ब्राह्मण यांना आवश्यक भासत होतें.

माहाराष्ट्रिक लोकांबरोबर उत्तरेकडील ब्राह्मण, विशेषतः ययुर्वेदि ब्राह्मण, दक्षिणेंत पुरोहितकर्मसंपादनार्थ उतरले व माहाराष्ट्रिकांबरोबर गांवगन्ना पसरले. नाग माहाराष्ट्रिकोत्पन्न मराठ्यांच्या गांवढळ संगतीनें हे यजुर्वेदी ब्राह्मणाहि अत्यन्त अज्ञ बनून गेले होते. ह्यांनाहि उजळा देण्याचें काम महाराष्ट्र - क्षत्रिय व विद्वान ब्राह्मण यांना जरूरीचें भासत होतें.

एणेंप्रमाणें चालुक्यराष्ट्रकूटयादवादींच्या अमदानींत (1) अल्पसंख्यांक भोजयादवादि उत्तरदेशीय महाराष्ट्र क्षत्रिय व ब्राह्मण (2) नाग माहाराष्ट्रिकोत्पन्न मराठे, देशमुख, पाटील व

कुणबी, (3) नाग-शूद्र व अतिशूद्र आणि (4) जोसपण कुलकरण करणारे गांवढ्यागांवचे यजुर्वेदी ब्राह्मण असे चतुर्विध संस्कृतीचे लोक देशांत होते आणि अल्पसंख्यांक महाराष्ट्र - क्षत्रिय व ब्राह्मण यांच्याकडे ह्या राष्ट्राचें व समाजाचें नियंतृत्व व चालकत्व होतें. अल्पसंख्यांक महाराष्ट्र क्षत्रियांचें व ब्राह्मणांचें बल काय तें त्यांच्या बरोबर उत्तरेकडून आलेल्या थोडयाश्या क्षत्रियांचें व ब्राह्मणांचें. उत्तरदेशीय क्षत्रिय व विद्वान ब्राह्मण राष्ट्रांतील वरिष्ठ लष्करी व मुलकी अधिकार चालवीत. बाकीं सैन्यांतील दरोबस्त जिल्हर शिपायगिरी व पायकी आणि मुलकी खात्यांतील व धर्मखात्यांतील दरोबस्त कारकुनी व ग्रामवृत्ति नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठ्यांकडे व गांवढळ यजुर्वेदी ब्राह्मणांकडे असे. हे निकृष्ट मराठे व यजुर्वेदी ब्राह्मण मराठी भाषा बोलत व वन्यदेवाहि नाना पाकृत देवधर्माचे उपासक असत. झुकानेवाला भेटला कीं हे झुकण्यास अज्ञानानें एका पायावर तयार असत. जैन, लिंगायत, मानभाव, गोरखपंथी, इत्यादि नाना पाखंडी या लोकांना भुलवीत व हे लोक त्या भुलवण्याला बळी पडत. इतकेंच नव्हे तर नवव्या दहाव्या शतकांच्या सुमारास नंदुरबार प्रांतांतील कित्येक यजुःशास्त्रीय व्यवहाऱ्यांनीं व सराफांनीं व रंगाऱ्यांनीं इराण, अरबस्थान व शामळदेश ह्यांच्यांशीं बेपार करतां करतां कांहीं मुसुलमान अवलियांचें शिष्यत्व पतकरिलें. जो कोणी पोटाला देईल, मग तो स्वधर्मी असो कीं विधर्मी असो, त्याची सेवा करण्यास हे नागोत्पन्न मराठे व यजुर्वेदी ब्राह्मण सारखेच तयार असत. मराठ्यांचा हा असा स्वभाव बनण्यास मुख्य कारण म्हटलें म्हणजे ह्यांचें नागवंशत्व होय. वांशिक ऊर्फ सामाजिक व्यावहारिक, राजकीय व धार्मिक बाबतींवर परिणाम घडल्याशिवाय रहात नाहींत त्याचें हें एक उदाहरण आहे.

अशा ह्या अज्ञानपंकांत डुबलेल्या प्राकृत जनांना त्याकालीं संस्कृत प्रांतांत फोफावलेल्या संस्कृतीचें बाळकडू संस्कृतभाषा द्वारा पाजूं म्हटलें तर तें अशक्य होतें, कारण प्राकृतांना संस्कृत भाषेची ओळख नव्हती. प्राकृतांची जी मराठी भाषा तींतून प्राकृतांना बाळकडू पाजावें, तर मराठी भाषा अद्याप अक्षरनिविष्टहि झाली नव्हती. त्यांतल्या त्यांत एक बाब मात्र समाधानाची होती. ती अशी कीं, सर्व महाराष्ट्रदेशभर देशमुख्यांपासून रंकापर्यंत सर्व जातींची व सर्व लोकांची मराठी ही शालिवाहनाच्या पांचव्या शतकापासून नवव्या शतकापर्यंतच्या अवधींत जन्मभाषा बनून गेली होती. प्रांतिक भेदानें मराठी भाषा प्रांतोप्रांतीं किंचित भिन्न उच्चारिली व बोलिली जाई. परंतु देवगिरी प्रांतांतील मराठी भाषा मध्यमवर्तित्वामुळें सर्व प्रांतांना सहज कळण्यासारखी असे. सबब, देवगिरीय प्रांतांतील मराठी भाषेला शिष्टत्व देऊन तिच्या द्वारा उच्च आर्यसंस्कृतीच्या

प्राकृतजनांत फैलाव करण्याचा निश्चय राज्यकर्त्या ब्राह्मणक्षत्रियांनीं केला. प्राकृतजनांत, उच्च आर्यसंस्कृतीचा फैलाव करणें म्हणजे आर्यसंस्कृतींत जे वर्णधर्म, आश्रयधर्म, शौचधर्म, जातिधर्म, कुलधर्म, राष्ट्रधर्म व देशधर्म त्या कालीं विद्यमान होतें व जें ऐतिह्य, शास्त्र्य व कलाज्ञान वृध्दिंगत झालें होतें तें प्राकृतजनांत पसरविणें. हे धर्म व हें ज्ञान प्राकृतजनांत त्या कालीं नव्हतें, असा ह्या विधानाचा अर्थ होतो. कां नव्हतें, तर हे प्राकृत लोक महाराष्ट्र क्षत्रियांच्या व ब्राह्मणांच्या राष्ट्राचे अवयव नव्हते, फक्त परकीय कामकरी होते. मराठे लोक नाग व माहाराष्ट्रिक या दोन लोकांच्या मिश्रणानें नुकतेच नवे लोक बनून फक्त पांच चारशें वर्षे लोटलीं होतीं. ह्या नव्या लोकांचें नवें महाराष्ट्र बनविण्याचा उच्च संकल्प तत्कालीन परकीय महाराष्ट्र क्षत्रिय व ब्राह्मण यांच्या मनांत स्वहितार्थ व स्वसंरक्षणार्थ उपरिनिर्दिष्ट समरसतेच्या सिध्दयर्थ उत्तरेकडून स्वकीय क्षत्रिय व ब्राह्मण दक्षिणेंत येण्याचें अनेक राजकीय व सामाजिक कारणांनीं जसजसें उत्तरोत्तर बंद होत चाललें, तसतसें महाराष्ट्रांतील मराठा, कुणबी, शूद्र व अतिशूद्र यांचा ममतेचा पाठिंबा मिळविणें राज्यकर्त्यांना अगत्याचें होऊन बसलें.

समरसता चार द्वारांनीं उत्पन्न करण्याचें ठरलें. पहिले द्वार भक्तीचें. असंस्कृत बुध्दीच्या अव्युत्पन्न मराठ्यालोकांत राम, कृष्ण इत्यादि दैवतांची भक्ति पसरविण्याकरितां अभंग, ओव्या, इत्यादि छंदांत काव्यनिर्मिति शक 900 पासून मराठींत ब्राह्मण कवींनी रूचिली. दुसरें द्वार ऐतिह्याचें. भारत, भागवत व रामायण ह्यातील प्रसंगांवर गद्यपद्य रचना करून भारतीय ऐतिह्याचें ज्ञान मराठ्यांत फैलाविण्याचा उपक्रम ह्याच कालीं झाला. तिसरें द्वार वेदांताचें. शांकरीय वेदांताचा प्रसार करण्याकरितां छिंदवाड्यांतील सिंद राजांचा आश्रित जो मुकुंदराज त्यानें ग्रंथरचना संस्कृतांत व प्राकृतांत ह्याच कालावधींत केली आणि पांचरात्रीय वेदांत ज्ञानदेवानें ह्याच मोसमांत गायिला. चवथें द्वार ग्रामजोश्यांच्या व कुणब्यांच्या उपयोगाचें ग्रहज्योतिषाचें व फलज्योतिषाचें. श्रीपतीनें आपली ग्रहगणिताची रत्नमाला असंस्कृतज्ञ ग्रामज्योश्यांना ग्रहगणित करून पंचांगें वनवितां यावीं म्हणून याच कालीं मराठींत गुंफिली आणि सहदेवभाडळीनें मेघमाला व संवत्सरफलें मराठींत कुणब्यांच्या माहितीकरितां संस्कृत ग्रथांतून ह्याच कालीं उतरलीं. अशा रीतीनें मराठी भाषेचा ग्रंथावतार मराठा लोकांच्या अनुग्रहार्थ शक 900 पासून 1200 पर्यंत होत होता व मराठा राष्ट्र आस्तेआस्ते साक्षर बनत होतें. तों इतक्यांत मुसुलमानांची धाड महाराष्ट्रावर येऊन शक 1240 त महाराष्ट्र यवनाधीन झालें व मराठी भाषेचा राजाश्रय नाहींसा झाला.

ह्या संकटसमयांत आर्यसंस्कृतीचें बीज मराठ्यांच्या मनोभूमींत गेल्या तीनशें वर्षात कितपत रूजलें होतें त्याची नामी परिक्षा उतरली. मराठा कुणबी शूद्र व महार हे आर्यधर्माला व हिंदू रूढीला बेमालूम बिलगले व यांच्यांतून फारच थोडया लोकांनीं धर्मान्तर केलें. परंतु, आर्यधर्माच्या बाहेरील जे हलालखोर, कसायी, रंगरेज इत्यादि अंत्यावसायि लोक, ज्यांच्यांत आर्यसंस्कृतीचा फैलाव अद्याप झाला नव्हता, ते सबंदच्या सबंद मुसुलमान बनले. हिंदू संस्कृतीच्या सीमाप्रदेशावरील अंत्यावसायी लोक मुसुलमान बनण्यांत मोठासा चमत्कार नव्हता. कारण, हे अंत्यावसायी लोक मुळांत हिंदू नव्हतेच. आर्यसंस्कृतिप्रसाराचें वारें देशांत कितपत भिनलें होतें. त्याची परीक्षा दुसऱ्याहि एका तऱ्हेनें झाली. मुसुलमानी अंमलाच्या भर ज्वानींत आर्यधर्मप्रसाराचें सत्कृत्य अठरापगड जातींतील संतांनीं अनन्वित छळ सोसूनहि पुढें चालू ठेविलें. तें इतक्या जोरानें ठेविलें कीं भारतांवर भारतें, रामायणांवर रामायणें व भागवतांवर भागवतें मराठी भाषेंत शक 1200 पासून पुढील पांचशें वर्षात लिहिलीं गेलीं. हा असला बिनखळ मारा मराठा, कुणबी, शूद्र व अतिशूद्र समाजावर करणें त्याकालीं अत्यन्त आवश्यक होतें. कारण शक 1200 शेंच्या पूर्वील माऱ्यानें धर्मांतर करण्यापासून मराठा समाज यद्यपि परावृत्त झाला होता तत्रापि हा समाज अद्याप बनावा तसा राष्ट्रीय बनला नव्हता. अद्याप परकीय मुसुलमान राज्यकर्त्यांविरूध्द उत्कट द्वेष त्यांच्या ठाई जसा बाणावा तसा बाणण्यास अवकाश होता. अद्याप मूर्ति फोडलेल्या, स्त्रिया भ्रष्ट केलेल्या, सज्जनांची अब्रू गेलेली, गोमातेचा वध झालेला उघडया डोळ्यानें बघण्याची मराठयांना खंती वाटत नव्हती.

अश्या राजकीय दृष्ट्या अर्धवट, लज्जास्पद व अधम स्थितींत दक्षिणेंतील नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठे लोक असतां, उत्तरेकडील ऐतरेयब्राह्मणानें गायिलेल्या भोजक्षत्रियांचे वंशज जे शहाजीराजे भोसले त्यांनीं यवनाशीं करामतींनें व पराक्रमानें झुंझून स्वराज्याचा पाया घालण्याचा साहसी उपक्रम स्वतःच्या एकटयाच्या हिंमतीवर रचिला. आर्यक्षत्रियांचें नांव पुनरपि त्रिभुवनभर गाजविलें आणि अखिल आर्यांच्या बेचाळीस पिढ्यांचा उध्दार केला!

उत्तरदेशीय महाराष्ट्र क्षत्रिय व नागमाहाराष्ट्रिकोत्पन्न मराठा क्षत्रिय हे ह्याच्या पुढील काळांत मिसळून व एकवटून जाऊन दोघांनाहि मराठा ही संज्ञा सारखीच कशी पडत चालली तो इतिहास अंशतः शहाजीकालाच्या नंतरचा असल्यामुळें, त्या संबंधाच्या तपशिलांत शिरण्याचें प्रस्तुत कारण नाहीं. महाराष्ट्र क्षत्रियांचा सोमवंश, माहाराष्ट्रिकांचा सूर्यवंश व नागांचा नागवंश

असे तीन वंश मिळून सध्यांचें मराठा राष्ट्र, अथवा खरें पाहिलें तर सध्यांचे मराठे लोक, बनले आहेत. चवथा परमार इत्यादिकांचा अग्निवंश. हा अग्निवंश केवळ कल्पित आहे असें चिंतामणराव वैद्य प्रतिपादितात. तत्रापि, एवढें खरें कीं परमार वगैरे ढुंढारदेशीय कुलें माहाराष्ट्रिकांच्या बरोबर दक्षिणेंत उतरलीं. त्यांची संस्कृति महाराष्ट्रिकांच्या संस्कृतीसारखीच असल्यामुळें, नागवंशमिश्रणानें माहाराष्ट्रिकांत जो बदल झाला तसला बदला परमारादींच्या मिश्रणानें झाला नाहीं.

# मराठी राज्याचा विकास

त्यावेळच्या मराठ्यांच्या राजकारणाचें रूप दोन प्रकारचें होतें. अंतस्थ व्यवस्था ठेवण्याचें राजकारण करणें हें एक रूप व सर्व भरतखंड हिंदुपदबादशाहींत आणणें हें दुसरें रूप. पैकीं पहिलें रूप कालांतरानें बनत बनत कसें बनलें हें पाहणें मोठें मनोवेधक आहे. शहाजीच्या पूर्ववयांत जी एक लहानशी जहागीर होती, ती शिवाजीनें 1646 त विजापूरच्या पातशाहींतून फोडून स्वतंत्र संस्थानाच्या पदवीस आणून सोडिली. विजापूरच्या पातशाहींतून स्वतंत्र झालेलें हें मावळांतील शकल वाढत वाढत 1674 त सह्याद्रीच्या पृष्ठवंशाच्या पूर्वेस व पश्चिमेस बागलणापासून फोंडयापर्यंत वीस पासून तीस मैलांच्या अंतरानें पसरलें. ह्या प्रसाराला स्वराज्य स्थापन अशी संज्ञा आहे. ह्यावेळीं राजा व अष्टप्रधान हींच काय तीं राज्याचीं अंगें होतीं. शिवाजीचें महाराष्ट्र त्यावेळीं वंशपरंपरेनें चालणारें व अष्टप्रधानोपदिष्ट असें एकसत्तात्मक राज्य होतें. शिवाजीच्या नंतर 27 वर्षांनी शाहू राज्यसनीं आल्यावर ह्या एकसत्तात्मक राज्यांत मांडलिक ऊर्फ सरंजामी सरदार उत्पन्न झाले. सरंजामी सरदारांनीं आपापल्या प्रांतांतील मुलकी, दिवाणी व लष्करी व्यवस्था पाहून छत्रपतींना पेषकष देऊन रहावें असा निर्बंध बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीत पडला. सरंजामी सरदार उत्पन्न व्हावयाला व शिवाजीच्या स्वराज्याच्या बाहेर मराठ्यांची सत्ता पसरण्याला एकच गांठ पडली.

स्वातंत्र्यार्थ लढाईचा निकाल औरंगझेबाच्या मृत्युसमयीं मराठयांच्या तर्फेनें लागल्यावर, मराठयांच्या शक्तीचा जोर स्वराज्याला पुरून परराज्यांत वावरूं लागला. मोंगलांची पिछेहाट झाल्यावर मराठयांची पेषामद व्हावी हें पराकाष्ठेची मेहनत करून स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांचें कुलक्रमागत व्रतच आहे. मोंगलांच्या प्रांतांत मराठयांचीं ही पेषामद मोठी चमत्कारिक झाली. राजाराम महाराज जिंजीस असतांना व राजाराम महाराज मृत्यु पावल्यावर खंडेराव दाभाडे, कंठाजी कदम बांडे, कान्होजी भोसले, चिमणाजी दामोदर, कान्होजी आंग्रे वगैरे सरदार बहुतेक स्वतंत्रपणें

मोंगलांच्या प्रांतांत व मोंगलांनीं जिंकिलेल्या स्वराज्यांतील प्रांतांत अम्मल चालवीत होते. राज्यावर येण्याच्या समयीं व नंतर आपल्या पक्षाला बळकटी यावी या हेतूनें शाहूनें ह्या बहुतेक स्वतंत्र सरदारांना आपल्या राज्याचे बहुतेक स्वतंत्र असे सरंजामी सरदार अथवा मांडलिक केले. मोंगलांच्या प्रांतांत अंमल करणाऱ्या ह्या सरदारांस संरजाम दिल्यावर स्वराज्यांतील अष्टप्रधान व इतर योध्दे यांसहि सरंजाम देणें शाहूस भाग पडलें. फितूर झालेल्या जाधव, निंबाळकर वगैरे सरदारांना निजामुल्मुलुखानें सरंजाम दिल्यामुळें, तितक्याच योग्यतेची लालुच आपल्याहि सरदारांना देण्याशिवाय दुसरी सोय शाहूजवळ राहिली नाहीं. सरदारांना सरंजामी करून टाकिल्यावर अष्टप्रधानांच्या उरावर शाहूनें एक मुख्य प्रधान अथवा पेशवा म्हणून अधिकारी नेमिला.

येथून पुढें पेशवा मुख्य व अष्टप्रधान गौण असा प्रकार झाला. अष्टप्रधानांतील बरीच मंडळी ताराबाईच्या पक्षाची असल्यामुळें शाहूला ही तोड काढावी लागली. येणेंप्रमाणें मराठयांच्या राज्यपध्दतींत सरंजामी सरदारीचा नवीन प्रवेश झाला, व तींतून अष्टप्रधानपध्दतीचा हळूंहळू लोप होत गेला. बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीत मराठी राज्य पध्दतीला, वंशपरंपरेनें चालणारी, एक प्रधानघटित मांडलिकसंस्थानोपर्वित, संयुक्त लष्करी एकसत्तात्मक पध्दति अशी संज्ञा तंतोतंत लागूं पडते. सारांश, शाहू व बाळाजी विश्वनाथ ह्यांच्या कारकीर्दीत संयुक्त साम्राज्याचें स्वरूप महाराष्ट्र राज्यपध्दतीला येत चाललें होतें, अथवा खरें म्हटलें असतां, आलेंच होतें. महाराष्ट्राच्या ह्या संयुक्त साम्राज्याचें रूप एका आधुनिक राष्ट्राच्या संयुक्त साम्राज्याच्या रूपासारखेंच होतें. इंग्लंड व इंग्लंडच्या वसाहती ह्यांचा जो संयोग सध्यां बनत चाललेला आपण पहात आहों तोच संयोग महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरील सरंजामी सरदारांचीं संस्थानें ह्यांचा त्यावेळीं बनत होता. भेद इतकाच कीं, इंग्लंडांत प्रतिनिधिनिक्षिप्त व बहुप्रधानघटित, वंशपरंपरेनें चालणारी एक सत्ता होती. युनाइटेड स्टेट्स, क्यानडा, ट्रान्सव्हाल ह्यांनीं जशी इंग्लंडच्या विरूध्द आजपर्यंत वेळोवेळीं खटपट केली, त्याप्रमाणेंच आंग्रे, दाभाडे वगैरेंनी महाराष्ट्राच्या विरूध्द केली. वसाहतींतील संस्थानांचे हितसंबंध इग्लंडच्या हितसंबंधांशीं गोवून टाकबाळाजी विश्वनाथ यांनीं नवीन उत्पन्न झालेल्या सरदारांचें हितसंबंध आपल्या हितसंबंधांशीं गोवून टाकिले. सरदेशमुखी, बाबती, साहोत्रा वगैरे बाबींची वाटणी सरदारांच्या संस्थानांतून व जिंकलेल्या प्रांतांतून छत्रपति व सरदार ह्यांच्यामध्यें त्यांनीं अशी करून टाकिली कीं मुख्य सत्तेचा स्पर्श सरदारांच्या सदा अनुभवास यावा व सरदारांच्या हालचाली सदा मुख्य सत्तेच्या देखरेखीखालीं रहाव्या. बाळाजी विश्वनाथाच्या ह्या शिस्तीलाच ग्रांट डफ ब्राह्मणाचा कावा म्हणून दूषण देतो (Duff. Chap. XII). कोणतेंहि राष्ट्र

संयुक्तसंस्थानाच्या पदवीला येऊन पोहोचलें म्हणजे संयोगांतर्गत संस्थानाचे हितसंबंध मुख्य सत्तेच्या हितसंबंधांशीं गोवून टाकणें अत्यंत आवश्यक कसें होतें ह्याचा अनुभव डफला नसल्यामुळें मुत्सद्देगिरीच्या ह्या धोरणाला तो 'ब्राह्मणांचा कावा' म्हणून दूषण देतो. परंतु संयुक्त साम्राज्याचें ओझें डोक्यावर येऊन पडलेल्या डफच्या नातवांना बाळाजी विश्वनाथाच्या ह्या धोरणाचा अर्थ जास्त उदात्त रीतीनें करतां येईल यांत संशय नाहीं. प्रसिध्द इतिहासतत्त्ववेते कैलासवासी महादेव गोविंद रानडे यांनीं बाळाजी विश्वनाथाच्या ह्या सरंजामी पध्दतीचे गुणानुवाद मोठया भारदस्त शब्दांनीं गायिले आहेत व ते, तत्कालीन वस्तुस्थिति लक्षांत घेतां, सर्वथैव योग्य आहेत. शिवाजीनें रचिलेल्या अष्टप्रधानघटित राज्यपध्दतीचें अनुकरण हिंदुस्थानांत ब्रिटिश मुत्सद्यांनीं केलें आहे असें ह्या तत्त्ववेत्त्याचें म्हणणें होतें. त्याचप्रमाणें मराठयांच्या साम्राज्याच्या हितार्थ बाळाजी विश्वनाथानें रचिलेली सरंजामी राज्यपध्दति, ब्रिटिश साम्राज्याशीं वसाहतींतील संस्थानांचे हितसंबंध जखडून टाकण्यास ब्रिटिश मुत्सद्यांनीं योजिलेल्या पध्दतीसारखीच आहे.

बाळाजी विश्वनाथाच्या सरंजामी पध्दतींतील कांहीं कलमें येणेंप्रमाणें होतीं. (1) आपापल्या ताब्यांतील प्रांतांत सरदारांनीं मुलकी व लष्करी अधिकार चालवावे. (2) प्रांतांतील उत्पन्नाचे हिशेब सरकारच्या सरदारांना दाखवून सरकारांत रूजूं करावे. (3) छत्रपती हुकूम करतील त्या मोहिमेस सरदारांनीं जावें. (4) सरकारच्या हुकुमाशिवाय परराष्ट्रांशीं तह किंवा लढाई करूं नये. (5) ठरविले पेषकष सरकारांत दरवर्षी भरणा करावी. (6) सरंजामी सरदारी वंशपरंपरा नसून सरकारास वाटेल त्यास ती देतां यावी, (7) छत्रपतींनी दिलेले किताब नांवापुढें चालवावे. (8) राज्याच्या बाबी प्रथम वसुलांतून काढून ठेवाव्या. (9) वसुलाच्या बाबी सरदारांनीं देशपरत्वें ठरवाव्या. (10) येणाऱ्या व जाणाऱ्या मालावर जकात बसवावी. ह्या पध्दतींतील हीं दहा कलमें मुख्य आहेत. ह्या पध्दतीअंवयें, दाभाडे, आंग्रे, बांडे, भोसले, वगैरे सरदारांशीं करारनामे बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीत ठरले होते. ह्या कलमांतील कराराच्या विरूध्द जो जाईल त्याचें पारिपत्य करणें छत्रपतींच्या अधिकारांतील होतें.

महाराष्ट्राच्या सिंहासनावर शाहूच्या आरोहणानें ज्याप्रमाणें सरंजामी सरदारांची उत्पत्ति झाली, त्याचप्रमाणेंच अवरंगझेबाच्या मरणानें मराठयांच्या संयुक्त सत्तेची अथवा साम्राज्याची प्राणप्रतिष्ठा झाली. अवरंगझेबाची व अवरंगझेबाच्या सैन्याची वाताहत केल्यावर ह्याच्या

साम्राज्याचा उपयोग घेण्याचा प्रयत्न कसकसा होत गेला ह्याचाहि वृत्तांत मोठा मनोरंजक आहे. 1707 त दिल्लीच्या पातशाहांचा मांडलिक ह्या नात्यानें शाहू प्रथम महाराष्ट्रांत आला. शाहू महाराष्ट्रांत येण्याच्या अगोदर जाधव, दाभाडे, बांडे, आंग्रे, भोसले वगैरे सरदारांनी अवरंगझेबाच्या भोंवतालील वऱ्हाड, खानदेश, गुजराथ, कोंकण, मिरज वगैरे प्रांतांत अंमल बसवून चौथाई व सरदेशमुखी वगैरे बाबी वसूल करण्याचा उपक्रम चालविलाच होता. शिवाजीच्या स्वराज्याच्या बाहेरील मोंगलांच्या प्रांतांत अंमल बसविण्याचा हा जो उद्योग तोच मराठयांचें साम्राज्य स्वराज्याच्या बाहेर पसरविण्याचा ओनामा होय. स्वराज्याच्या बाहेर उद्योग करणाऱ्या ह्या सरदारांना आपल्या पक्षाकडे ओढून घेऊन, शाहूनें मराठयांचें साम्राज्य पसरविण्याच्या व्रताचाहि स्वीकार केला. परंतु हा स्वीकार शाहूनें मोठया नाजूक युक्तीनें केला. 1718 त सय्यद बंधूंना साहाय्य करण्याकरितां जेव्हां बाळाजी विश्वनाथ दिल्लीस गेला तेव्हां खानदेश, वऱ्हाड, गुजराथ, कोंकण व विजापूर ह्या प्रांतांत मराठयांनीं मिळविलेला मुलूख दक्षिणच्या सहा सुभ्यांच्या सनदेबरोबर पातशहाकडून बहाल व्हावा अशी अट सय्यदांकडून शाहूनें कबूल करून घेतली. चिनकुलीचखानाचा म्हणजे निजामुल्मुलुखाचा पक्ष दुर्बल करण्यास, सय्यदांचा मराठयांना ही अट बहाल करण्यांत फायदाच होता. गुजराथ, वऱ्हाड, बंगाला, ओढया, माळवा, औरंगाबाद, विजापूर, कोंकण वगैरे प्रांतांत जेथें जेथें सय्यदांचे शत्रू असतील तेथें तेथें त्यांना मराठयांकडून तंबी बसावी हा तर सय्यदांचा मुख्य हेतु होता. दिल्लीच्या पातशहाच्या हुकुमानें त्या त्या प्रांतांतील मुसलमान सुभेदारांशीं आपण भांडत आहोंत असा राजरोस हक्क सुभेदारांचे प्रांत जिंकण्यांत मराठयांनाही सांगतां आला. ह्यावेळी पातशहानें नेमिलेले मुसलमान सुभेदार दिल्लीपतीचे शत्रू म्हणून नांवाजले गेले व मराठे आज्ञाकारक सेवक म्हणून दुनियेंत प्रसिध्द झाले. निजामुल्मुलूख, सुरबुलंदखान, जंजिरेकर, दयाबहादूर वगैरे सुभेदारांशीं मराठयांचीं जी युध्दें झालीं तीं मराठे दिल्लीपतीचे सेवक ह्या नात्यानेंच झालीं. सारांश, मराठयांचें साम्राज्य दिल्लीपतीची सेवा करतां करतांच वाढलें.

# इतिहासाच्या दोन बाजूः भौतिक व आध्यात्मिक

कोणत्याहि संस्कृत राष्ट्राच्या चरित्राचा सांगोपांग विचार करावयाचा म्हटला म्हणजें तो अनेक दृष्टींनीं केला पाहिजे. धर्म, नीति, विद्या, समाज, व्यापार, कृषि, कलाकौशल्य, कायदेकानू, राजकारण, व तत्सिध्दयर्थ केलेल्या अंतःस्थ व बहिःस्थ खटपटी इतक्या सर्वांच्या प्रगतीचा किंवा विगतीचा कालक्रमानें यथास्थित, बांधेसूत, पध्दतवार व सप्रमाण विचार केला जाऊन तो पुनः आत्मिक व भौतिकरीत्या झाला म्हणजे राष्ट्राचें चरित्र समग्र कळलें, असें होतें. येथें आत्मिक व भौतिक हे शब्द कोणत्या अर्थाचे वाचक आहेत तें सांगितलें पाहिजें. धर्म, नीति, विद्या, राजकारण, इत्यादि राष्ट्राच्या चरित्राचीं जीं निरनिराळीं अंगें सांगितलीं त्यांचा विचार दोन तऱ्हेनें करितां येईल. हीं अंगें कार्याच्या रूपानें फलित झालेलीं पाहून त्या फलित रूपांचें पध्दतवार वर्णन करण्याची एक तऱ्हा आहे व हींच अंगें कारणरूपानें असलेलीं पहाणें म्हणजे वर सांगितलेल्या फलित कार्यांचीं कारणें म्हणून त्यांचा विचार करणें म्हणजेच दुसऱ्या तऱ्हेचा अंगिकार करणें होय. पहिल्या तऱ्हेला मी भौतिक म्हणतों व दुसरीला आत्मिक म्हणतों.

भौतिक पध्दतीनें कोणत्याहि धर्माचा विचार करावयाचा म्हणजे त्या धर्मांतील निरनिराळ्या पंथांचें जीवनवृत्तांत द्यावयाचे; म्हणजे ते पंथांचें जीवनवृत्तांत द्यावयाचे; म्हणजे ते पंथ किती आहेत, त्यांचीं स्थलांतरें कोठें कोठें झालीं, निरनिराळ्या पंथांच्या कलहांचें स्वरूप काय होतें इत्यादि बाह्य रूपांचीं वर्णनें करावयाचीं; आणि आत्मिक पध्दतीनें कोणत्याहि धर्माचा विचार करावयाचा म्हणजे त्या धर्माचीं मूलतत्त्वें काय आहेत, आत्म्याच्या अनेक वृत्तींतून कोणत्या वृत्तीचें त्या धर्मात प्राधान्य आहे, इत्यादि अंतःस्थ व गूढ प्रश्नांचा ऊहापोह करावयाचा. भौतिक पध्दतीनें कलाकौशल्याचा विचार करावयाचा म्हणजे त्याच्या शाखा किती आहेत, निरनिराळ्या शाखांचा संकर किती झाला व शाखांचीं स्थलांतरें कोठें कोठें झालीं हें सांगावयाचें आणि आत्मिकरीत्या कलाकौशल्याचा विचार करावयाचा म्हणजे आत्म्याच्या कोणत्या वृत्तीपासून

कलाकौशल्याचा उगम होतो वगैरे अंतःस्थ व गूढ प्रश्नांचा उलगडा करावयाचा. त्याचप्रमाणें भौतिक पध्दतीनें कोणत्याहि राष्ट्राच्या राजकीय गतिस्थितींचा विचार करावयाचा म्हणजे त्या राष्ट्रांत झालेल्या अंतस्थ कलहांचीं व बहिःस्थ कलहांचीं वर्णनें द्यावयाचीं; म्हणजे राष्ट्रांत्तील बंडांचीं, निरनिराळ्या पक्षांच्या, वर्गांच्या व जातींच्या चढाओढींचीं व परराष्ट्राशीं झालेल्या लढायांचीं वर्णनें द्यावयाचीं आणि आत्मिक पध्दतीनें राष्ट्राच्या राजकीय गतिस्थितींचा विचार करावयाचा, म्हणजे अंतःस्थ व बहिःस्थ कलहांच्या उत्पत्तीचीं कारणें, त्या राष्ट्रांतील एकंदर लोकसमूहांत आत्म्याच्या उन्नतावनत वृत्तीपैकीं कोणत्या वृत्तीचें विशेष प्राबल्य आहे त्याचा सूक्ष्म विचार, त्या राष्ट्रांतील मोठमोठया तटांच्या पुरूषांच्या राजकीय गतिस्थितींचा भौतिक व आत्मिकदृष्ट्या जो विचार त्यासच राष्ट्राचा राजकीय इतिहास म्हणतात. धर्म, नीति, विद्या, समाज, व्यापार, कृषि, कलाकौशल्य ह्यांतील एक किंवा अनेक अंगांचें प्राबल्य किंवा दौर्बल्य होऊन राष्ट्राच्या राजकीय इतिहासांत करावा लागतो. येणेंप्रमाणें कोणत्याहि राष्ट्राचा सर्वांगांनीं संपूर्ण असा राजकीय इतिहास लिहावयाचा म्हटला म्हणजे तो भौतिक व आत्मिक अशा दोनहि पध्दतींनीं लिहिला पाहिजे.

# इतिहास म्हणजे काय?

मानवी इतिहास काल व स्थल ह्यांनीं बध्द झालेला आहे. कोणत्याहि प्रसंगाचें वर्णन द्यावयाचें म्हटलें म्हणजे, त्या प्रसंगाचा परिष्कार विशिष्ट कालावर व विशिष्ट स्थलावर पसरवून दाखविला पाहिजे. प्रसंगांचा परिष्कर कालानें व स्थलानें विशिष्ट कसा झाला आहे, हें दाखवितांना त्या कालीं व त्या स्थळीं कोणत्या व्यक्ती प्रामुख्यानें पुढें येतात हेंहि इतिहासकाराला स्वाभाविकपणेंच सांगावें लागतें. सारांश, काल, स्थल व व्यक्ति ह्या त्रयीची जी सांगड तिलाच प्रसंग व ऐतिहासिक प्रसंग ही संज्ञा देतां येते.

कोणत्याहि बखरींत किंवा इतिहास हें प्रौढ नांव धारण करणाऱ्या ग्रंथांत जेथें ह्या त्रयींतील एकाची किंवा सर्वांची गफलत अगर लोप केलेला असतो तेथें ऐतिहासिक प्रसंगाची यथास्थित व सशास्त्र मांडणी झाली नाहीं असें म्हणावें लागतें. परीक्षेकरितां घेतलेल्या बखरींत व इतिहास हें प्रौढ नांव धारण करणाऱ्या ग्रांट डफच्या ग्रंथांत योग्य आधार न मिळाल्यामुळें किंवा योग्य आधार मिळविण्याची खटपट न केल्यामुळें, किंवा शिक्षणाभावामुळें किंवा केवळ अज्ञानामुळें वर सांगितलेल्या त्रयींतील एकाचा किंवा अनेकांचा लोप वेळोवेळीं झालेला वाचकांच्या नजरेस (आम्ही) आणून दिला आहे. ज्यांनीं प्रसंग घडवून आणिले, त्या व्यक्तींच्या नांवांचा लोप किंवा गफलत, जेव्हां प्रसंग घडले त्या कालचा लोप किंवा गफलत, व जेथें प्रसंग घडले त्या स्थलांचा लोप किंवा गफलत बखरकारांच्या बखरींत व ग्रांट डफच्या इतिहासांत अनेक प्रसंगीं झाल्याकारणानें प्रसंगांचा कालानुक्रम, त्यांचें व्यक्तिमाहात्म, व त्यांचें स्थलवैशिष्ट्य व्यवस्थित रीतीनें ध्यानांत येणें मुष्कील होतें व इतिहासाच्या अस्तित्वाचें मुख्य प्रयोजन व हेतु निष्फल होतात. व्यक्तींच्या हातून विशिष्ट कालीं व विशिष्ट स्थळीं घडलेल्या अनेक प्रसंगांचें मुद्देसूद, तपशीलवार, व व्यवस्थित वर्णन देतां देतां विशिष्ट कालीं व विशिष्ट देशांत कोणत्या महाविचाराची कशी उत्क्रांती झाली व काय परिणाम झालें, हें वर्तमान व भावी पिढयांना दाखवून देण्याचें भूत व वर्तमान इतिहासांचें मुख्य प्रयोजन आहे. हें प्रयोजन मराठी व मुसलमानी बखरींतील व ग्रांट डफच्या ग्रंथांतील मजकुरांवरून व्हावें तसें साध्य होत नाहीं. ह्याला मुख्य कारण ह्या ग्रंथांत कालाचा, स्थलांचा किंवा व्यक्तींचा योग्य व व्यवस्थित निर्देश झाला नाहीं हें होय. अर्थात, इतिहास व

तज्जन्य उपदेश ह्या बखरींतील व इतिहासांतील मजकुरापासून उदभूत होत नाहींत. विशिष्ट काल, विशिष्ट स्थल व विशिष्ट व्यक्तींचें विशिष्ट आचरण ह्या तीन घटकांचा संघात झाला असतां प्रसंग ही वस्तू बनली जाते व अनेक प्रसंगांच्या व्यवस्थित संततीपासून इतिहास म्हणून ज्या वस्तूस म्हणतां येईल तिची निर्मिती होते.

ही निर्मिती होत असतां अनेक कालांशांनीं घटित जो कालाचा महाभाग ज्यास epoch, age, मंवंतर वगैरे संज्ञा देतात, त्यांत कोणत्या विचाराचें प्राधान्य आहे हें सहज समुदभूत होतें. ह्या विचारापासूनच वर्तमान व भावी पिढयांना गतकालीन पिढयांच्या कर्मसंततीचें ज्ञान होतें. कोणती कर्मसंतती घेऊन आपला समाज जन्माला आला आहे व कोणत्या दिशेचें आचरण ठेविलें असतां, कालांतरानें का होईना, पण होईल हेंहि ह्या गतकालीन विचारापासून अंशतः कळं लागतें. गतकालीन पिढयांच्या कर्माचें जें ज्ञान - ज्यास युगमाहात्म, Spirit of the age, Esprit d'epoc, वगैरे निरनिराळया भाषांतून समानार्थक संज्ञा आहेत - त्यासच इतिहासाचा आत्मा म्हणतात, किंवा इतिहासाचा आत्मा अशी औपचारिक भाषा योजण्यापेक्षां, त्यासच इतिहास हा व्यपदेश सामान्येंकरून देतात.

हें युगमाहात्म्य, हें कालमाहात्म्य, हा इतिहासाचा आत्मा दाखवून देण्याचें अवघड काम अद्यापपर्यंत महाराष्ट्रांत कोण्याहि इतिहासकारानें यथास्थित केलें नाहीं. कां कीं, वर निर्दिष्ट केलेल्या घटकत्रयीचा पत्ता क्रमवार ह्या इतिहासकारांना लागला नाहीं. घटकत्रयीचा संघात कसा झाला, हें त्यांना कळलें नाहीं व अर्थात महाराष्ट्राच्या इतिहासाच्या आत्म्याची ओळख त्यांना बिलकुल झाली नाहीं. घटकत्रयीचा पत्ता नीट न लागल्याकारणानें आत्मिक इतिहासाची ओळख ह्या इतिहासकारांना झाली नाहीं एवढेंच नव्हे, तर अर्थात तत्कालीन लहानमोठया व्यक्तींच्या चरित्रांतील अनेक गोष्टींचें अज्ञान त्यांचें ठायीं कायम राहिलें.

राष्ट्रांतील मोठमोठया व्यक्तींची चरित्रें म्हणजेच राष्ट्राचा इतिहास होतो, असें एक विधान आहे व तें बव्हंशीं खरें आहे. व्यक्ती ह्या समाजाच्या घटक होत व मोठया व्यक्ती समाजाचे मोठे घटक होत. अर्थात मोठया व्यक्तींचीं चरित्रें कांहीं एका अंशानें समाजाचा इतिहास होत.

लहान व्यक्तींचीं चरित्रें व मोठया व्यक्तींचीं चरित्रें मिळून समाजाचा संपूर्ण इतिहास होतो. समाजांत मोठया व्यक्ती केव्हांहि थोडया असल्यामुळें मोठया व्यक्तींच्या इतिहासाला लहान व्यक्तींच्या म्हणजे बहुजनसामाच्या इतिहासाचा जोड द्यावा लागतो. केवळ मोठमोठया

व्यक्तींच्याच चरित्रानें समाजाचा इतिहास संपूर्ण होत नाहीं, हें पक्कें समजून पाश्चात्य इतिहासकार बहुजनसमाजस्थितिसंबंधीं देववेल तितकी सशास्त्र व सप्रमाण माहिती आपापल्या इतिहासांतून देत असतात. मराठी बखरकारांना व ग्रांट डफला मोठमोठया व्यक्तींच्या चरित्रांतील बहुतेक प्रत्येक प्रसंगाची माहिती अपुर्ती, त्रोटक, तुटक व अव्यवस्थित देऊन समाधान मानणें जेथें भाग पडलें, तेथें त्यांच्या ग्रंथांतून तत्कालीन बहुजनसमाजाच्या स्थितीचें वर्णन वाचण्याची अपेक्षा करणें म्हणजे अयोग्य स्थलीं अपेक्षित वस्तूचा शोधकरण्याचा व्यर्थ परिश्रम करण्यासारखेंच आहे.

# मगध

**मगध** शब्दाची व्युत्पत्ति शब्दकल्पद्रुम "मग दोषं दधाति इति मगधः" अशी देतो. 'मग' म्हणजे दोष असा अर्थ शब्दकल्पद्रुमकर्त्यानें कोठून दिला असेल तो असो. कोणत्याहि संस्कृत कोशांत 'मग' म्हणजे दोष असा अर्थ सांपडत नाहीं. तेव्हां 'मग' म्हणजे दोष हा अर्थ ऐतिहासिक नाहीं, केवळ काल्पनिक असलेला दिसतो. **वाचस्पत्यांत** 'मग' या शब्दाचा दोष हा अर्थ येणेंप्रमाणें काढिला आहेः- "मगधः देशभेदः। स च कीकटेतिसंज्ञः अंगदेशस्थः। अंगवंगकलिंगान्ध्रान संस्कारमर्हति इति भिताक्षरायां देवलः। अतः मगधस्य पापजनकत्वात मगधशब्दस्य दोषार्थत्वम।" ह्या अर्थनिष्पादनपध्दतीनें अंग, वंग, आंध्र हेहि शब्द पापर्थक होऊं लागतील. अर्थात, 'मग' म्हणजे दोष हा अर्थ ऐतिहासिक नाहीं, ओढून ताणून काढलेला आहे. सबब तिरस्करणीय होय.

माझ्यामतें **मगध** शब्द येणेप्रमाणें व्युत्पादावाः- "मगान दधाति इति मगधः।" **मग** लोकांना धारण करतो जो देश तो **मगध. मग** म्हणजे शकद्वीपां- (मध्य आशिया) तील ब्राह्मण. ते ज्या देशांत येऊन राहिले तो **मगध** देश. ते त्या देशांत राहूं लागल्याच्या पूर्वी त्या देशाला काय म्हणत असत, तें सांगण्यास कांहीं साधन मला उपलब्ध नाहीं. **मगध** देशांत बुध्दाचा उदय ( व कदाचित जन्म) झाला. बुध्द हा शाक्य ऊर्फ शकवंशीय होता. बुध्दाला शक म्हणत नाहींत, शाक्य म्हणतात व त्याच्या कुळालाहि शक्य म्हणतात. ह्याचा अर्थ इतकाच कीं, **मगध** म्हणून जो देश प्रसिध्द होता त्यांत शकद्वीपांतील शक लोक ब्राह्मण, क्षत्रिय, आदिकरून येऊन वसाहत करते झाले व त्या शक लोकांतील **मग** ब्राह्मणांवरून त्या देशाला **मगध** हें नांव मिळालें.

**मगध** हा शब्द पाणिनीला माहीत आहे (4-1-170) - 'द्वयत्र मगध कलिङ् सूरमसादण् ।' अर्थात **मगादि** शकलोक पाणिनीच्या पूर्वी **मगधांत** येऊन राहिले हें उघड आहे.

मगध म्हणजे स्तुतिपाठक असा एक अर्थ आहे. तो 'मगध्' या संस्कृत धातूपासून निघाला आहे. 'मगध्यन्ते इति मगधाः । मगध् याच्त्र्यायाम् ।' धातुपाठांत 'मगध परिवेष्टने, नीचदास्ये इति अन्ये'। असा अर्थ दिला आहे. पैकीं नीचदास्यार्थक जो 'मगध' धातु तो मगध या देशनामावरून निघालेला आहे. ह्यावरून असें दिसतें कीं, 'मघध' ह्या धातूला नीचदास्यात्मक अर्थ त्या देशांत याच्त्रा करणाऱ्या व वंशस्तुति करणाऱ्या कांहीं धंदेवाईक भिक्षेकऱ्यांवरून आला असावा. 'मगध् परिवेष्टने' हा धातु 'मगध याच्त्रायां' ह्या धातूहून अगदीं निराळा. इंग्रजींत 'know

जाणणें’ हा धातु 'know स्त्रीसंग करणें’ ह्या धातूहून जसा निराळा तसाच ‘मगध् परिवेष्टने’ हा धातु ‘मगध याच्त्रायाम्’ ह्या धातूहून निराळा. 'know’ जाणणें ह्या धातूचा संबंध संस्कृत ‘ज्ञा’ धातूशीं आहे व 'know स्त्रीसंग करणें’ ह्या धातूचा संबंध संस्कृत ‘जन् उत्पन्न करणें’ ह्या धातूशीं आहे. इंग्रजींत दोन्हीं धातूंचा अपभ्रंश एकच होऊन त्याचा उच्चार ‘नो’ असा एकच झालेला आहे. ‘ज्ञा’ तील ‘ज’ बद्दल ‘K’ व ‘त्र’ बद्दल 'n’; आणि ‘जन्’ तील ‘ज’ बद्दल ‘K’ व ‘न’ बद्दल 'n’ अशा दोन्हीं धातूंतील व्यंजनांच्या खुणा इंग्रजी अपभ्रंशांत एकच राहिल्यामुळें दोन्ही धातूंचा एकच उच्चार होतो. अर्थावरून मात्र दोन निरनिराळे धातु आहेत, हें ओळखता येतें. तद्वतच ‘मगध याच्त्रायां’ व ‘मगध् परिवेष्टने’ हे दोन निरनिराळे धातु एकाच उच्चारानें यद्यपि उच्चारिले जातात, तत्रापि पूर्ववैदिक भाषांत ‘मगध् परिवेष्टने’ धातूचें कांहीतरी मूळ असावें ‘मगध याच्त्रायां’ या नामधातूची संज्ञा **मगध** देशाच्या नांवावरून पडलीं, हे वर दाखविलेंच आहे. हा याच्त्रार्थक ‘मगध्’ धातु नामधातु आहे. परिवेष्टनार्थक ‘मगध्’ धातु नामधातु नाहीं. अचिकित्सक संस्कृत वैयाकरणांनीं हे दोन धातु एकच समजून त्याची गणना कण्ड्वादि गणांत केली आहे.

**मगध्** देशाच्या नांवावरून याच्त्रार्थक ‘मघध्’ धातु हा ज्याअर्थी निघालेला आहे, त्याअर्थी स्तुतिपाठक जे मगध् भिक्षेकरी ते त्या देशांत **मग** येऊन राहिल्यावर त्या देशाला **मगध** हें अभिधान प्राप्त झाल्यानंतर इतर प्रांतांत **मगध** किंवा **मागध** या नांवानें ओळखिले जाऊं लागले, हें उघड आहे. हा प्रकार कसा झाला त्याचें प्रत्यंतर अर्वाचीन इतिहासांतील एक देतों. महाराष्ट्रांत ‘गुजराथी’या शब्दाचा दारवान असा अर्थ आहे. ‘पंजाबी’ या शब्दाचा विशिष्ट जातीचा पहिलवान असा अर्थ आहे, व ‘गोवेकरीण’ ह्या शब्दाचा विशिष्ट प्रांतीची वेश्या असा अर्थ आहे. आम्ही एक ‘गुजराथी’ ठेविला आहे, किंवा ‘भय्या’ ठेविला आहे, किंवा ‘पंजाबी’ पाळला आहे किंवा ‘गोवेकरीण’ राखिली आहे, ह्या वाक्यांत पाणक्या, दारवान्, पंजाबी, वेश्या ह्या अर्थाची प्रतीति जशी सांप्रत कालीं होते तशीच प्रतीति प्राचीन काळी **मगध** किंवा **मगधा** ह्या शब्दश्रवणानें स्तुतिपाठक ह्या अर्थाची होत असे. तात्पर्य, मगध देशांतून राजवंशस्तुतिपाठक प्राचीन कालीं उत्पन्न होत, - इतके फार उत्पन्न होत कीं, स्तुतिपाठक या शब्दाला मगध हा शब्दपर्याय झाला.

# नट आणि निच्छिवि

जैनधर्माचा संस्थापक महावीर हा नट जातीचा होता, हें प्रसिध्द आहे. ह्या नट जातीचा उल्लेख मनुसंहितेच्या दहाव्या अध्यायाच्या 22 व्या श्लोकांत केला आहे. व्रात्यक्षत्रियांपासून सवर्ण म्हणजे क्षत्रिय स्त्रीच्या ठायीं जी प्रजा होते तिला नट ही एक संज्ञा असलेली मनुसंहितेंत वर्णिली आहे. तेव्हां त्या व्रात्यक्षत्रिय जातींत महावीर जन्मला हें सांगावयास नकोच.

ही नटजाति वैशाली नगराजवळ रहात असे. ह्या वैशाली नगरींत लिंच्छवि नामक क्षत्रियांचें त्या कालीं वास्तव्य असे. लिंच्छवि म्हणजे मनुसंहितेच्या दहाव्या अध्यायाच्या 22 व्या श्लोकांत उल्लेखिलेली निच्छिविनाम व्रात्यक्षत्रियाची जात होय. निच्छिवि या शब्दांतील नि च्या ठिकाणीं लि आदेश होऊन लिच्छिवि हा प्राकृत शब्द निष्पन्न झाला. प्राकृतांत असा न चा च होतो. उदा. निंब (संस्कृत) = लिंब (प्राकृत). ह्या प्राकृत लिच्छिवि शब्दाचा लिच्छवि हा अपभ्रंश किंवा पर्याय आहे.

हा लिच्छिवि जातींतील कुमारदेवींशीं शक 220 च्या सुमारास गुत्पवंशाचा आदिपुरूष जो पहिला चंद्रगुप्त त्यानें लग्न लाविलें. (V.A. Smith's Early History of India, Chap. XI).

हा निच्छिवि शब्दाचा भारतांतील शिबि, शिवि या देशवाचक व तद्देशराजवाचक शब्दांशीं संब6ध असलेला दिसतो. शिविदेशाच्या जवळील जो प्रदेश तो निच्छिवि. शिविदेशांतील शिविनामक शुध्दक्षत्रियांपासून जे व्रात्यक्षद्रिय झाले त्यांचा जो देश तो निच्छिवि देश.

निच्छिवि, लिच्छिवि, ऊर्फ लिच्छवि व्रात्यक्षत्रियांचें नेपाळांत शक 557 च्या सुमारास राज्य सुरू झालें.

ह्या लिच्छवि जातींचें नांव गौतमबुध्दाच्या चरित्रांत अति येतें.